

200

महाराष्ट्र शासन,
आदिवासी विकास विभाग



# महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळामार्फत आदिवासी जमातींसाठी राबविण्यात येणा-या खावटी कर्ज योजनेचे मूल्यमापन



**वर्ष - २००९-१०**

आयुक्त,
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे ४११ ००१

# प्रस्तावना

महाराष्ट्रातील आदिवासी समाजाचा जीवनस्तर उंचावण्यासाठी वेगवेगळया योजना राबविण्यात येतात. या योजनांच्या लाभांचे आदिवासींची आर्थिक स्थिती, सामाजिक स्थिती, प्रगती, आरोग्य इत्यादीवर झालेला परिणाम/बदल याबाबतचे मूल्यमापन आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेमार्फत करण्यात येते.

याकरिता खावटी कर्ज वाटपाबाबतचे मूल्यमापन या संस्थेतील ए.क्षे.वि.का. कक्षामार्फत पूर्ण करण्यात आले आहे. यासाठी गोंदिया, गडचिरोली, नंदूरबार व ठाणे या ४ जिल्ह्यांची निवड करुन त्यातील १० तालुक्यातील २९ गावांमधून सदरचे मूल्यमापनाचे सर्वेक्षण पूर्ण करण्यात आले.

सदर मूल्यमापन पाहणीचे क्षेत्रीय काम श्रीमती.ए.एस.काळे, उपसंचालक (ए.क्षे.वि.का.), श्री.एस.एम.यादव, सांख्यिकी अधिकारी, श्री.यु.एम.यादव, आरेखक, श्री.पी.बी.कुदळे, संशोधन सहायक, श्री.अे.सी.गायकवाड, संशोधन सहायक व श्री.आर.एस.पवार, अन्वेषक यांनी पूर्ण केले आहे.

मूल्यमापन अहवाल लिहिण्याचे काम श्रीमती.अे.अेस.काळे, उपसंचालक यांचे मार्गदर्शनाखाली श्री.एस.एम.यादव, सांख्यिकी अधिकारी यांनी पूर्ण केलेले असून अहवालाचे संगणकीय टंकलेखनाचे काम (डी.टी.पी.) श्रीमती.एस.व्ही.बोंबले, सांख्यिकी सहायक व श्री.आर.एस.पवार, अन्वेषक यांनी केले आहे.

योजना राबविताना येणा-या अडचणी व त्याचे निराकरण करण्यांसाठी तसेच आदिवासींसाठी योजनांची आखणी करताना, आदिवासींचा जीवनस्तर उंचावण्यासाठी व आदिवासी जीवनाचा अभ्यास करणा-या सर्वांना या पुस्तकाचा उपयोग होईल अशी अपेक्षा आहे.

ठिकाण :- पुणे

दिनांक :- जुलै,२००९

( डॉ. अरविंदकुमार झा)
आयुक्त,
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे-१

# : : अ नु क्र म णि का : :

| प्रकरण क्रमांक | विषय | पृष्ठ क्रमांक पासून | पृष्ठ क्रमांक पर्यंत |
|---|---|---|---|
| | प्रस्तावना :- महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळामार्फत आदिवासी जमातींसाठी राबविण्यात येणा-या खावटी कर्ज योजनेचे मूल्यमापन | ३ | - |
| १) | मूल्यमापनाचे उद्देश | ४ | - |
| २) | मूल्यमापनाची कार्यपध्दती | ५ | - |
| ३) | पृथःकरण | | |
| | ३.१ क्षेत्रीय पाहणी | ६ | ७ |
| | ३.२ लिंग भेदानुसार वर्गीकरण | ८ | ९ |
| | ३.३ जमातनिहाय वर्गीकरण | १० | १२ |
| | ३.४ साक्षरता | १३ | १५ |
| | ३.५ शैक्षणिकस्तर | १६ | १७ |
| | ३.६ खावटी कर्ज वाटप लाभार्थी जमीनधारणा | १८ | २२ |
| | ३.७ पशुधन | २४ | २५ |
| | ३.८ घरांची स्थिती | २७ | २८ |
| | ३.९ व्यवसायानुसार वर्गीकरण | ३० | ३१ |
| | ३.१० वार्षिक उत्पन्नानुसार वर्गीकरण | ३३ | ३७ |
| | ३.११ खावटी कर्ज वाटप योजना (माहितीचा स्त्रोत) | ३९ | ४० |
| | ३.१२ खावटी कर्ज वाटप - मिळालेली मदत वर्षनिहाय | ४२ | ४५ |
| | ३.१३ खावटी कर्ज वाटप रोख रक्कमेचा विनियोग व कर्ज परतफेड | ४६ | - |
| | ३.१४ योजना राबविण्यातील अडचणी व उपाय योजना | ४७ | ४८ |
| ४ | सारांश | ४९ | ५० |
| ५ | निष्कर्ष | ५१ | - |

# प्रकरण - १
## मूल्यमापनाचे उद्देश

महाराष्ट्र राज्यातील आदिवासींची आर्थिक स्थिती (सुधारणा) अधिनियम, १९७६ चे तरतुदींनुसार आदिवासी उपयोजना क्षेत्रातील विशिष्ट घटकांकडून आदिवासी बांधवांची होणारी आर्थिक पिळवणूक व शोषण थांबविण्याकरीता, ऐन पावसाळयात उपासमार होऊ नये म्हणून खावटी कर्ज वाटप ही योजना सन १९७८ पासून आदिवासी क्षेत्रात सुरु करण्यात आलेली आहे.

आदिवासींच्या आरोग्यात सुधारणा करणे, त्यांना आरोग्यविषयक सुविधा पुरविणे, विविध रोजगार विषयक कार्यक्रमातंर्गत वर्षभर पुरेल एवढा रोजगार उपलब्ध करुन देणे, आदिवासींना पिण्याचे शुध्द व पुरेसे पाणी उपलब्ध करुन देणे, अन्नधान्य पुरवठा सुनिश्चित करुन पुरक आहार देणे, आणि या सर्व योजनांव्दारे आदिवासींचे क्रियाशील आयुष्य वाढविणे हा नवसंजीवन योजनेचा प्रमुख उद्देश आहे. या योजनेतंर्गत विविध घटक कार्यक्रमांचा समावेश करण्यात आलेला आहे. त्यामध्ये **खावटी कर्ज** योजनेचा समावेश आहे. सदरची योजना महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळामार्फत राबविण्यात येते.

१) खावटी कर्ज वाटप योजनेचा लाभ आदिवासींना मिळाला आहे किंवा कसे याचा अभ्यास करणे.

२) खावटी कर्ज योजनेचा लाभ अल्पभूधारक, भूमीहीन शेतमजूर व दारिद्रय रेषेखालील आदिवासींना मिळाला आहे किंवा नाही याचा अभ्यास करणे.

३) शासकीय नियमाप्रमाणे खावटी कर्ज योजनेअंतर्गत आदिवासींना वस्तूरुपाने व रोख स्वरुपात योग्य वाटप झाले किंवा नाही याचा अभ्यास करणे.

४) खावटी कर्ज वाटप योजनेत आढळलेल्या त्रृटींचा अभ्यास करणे.

५) खावटी कर्ज वाटप योजनेचा आदिवासींच्या आर्थिक स्थितीवर झालेल्या परिणामांचा अभ्यास करणे.

*******

# प्रकरण - २
## मूल्यमापनाची कार्यपध्दती

आदिवासी जमातींसाठी खावटी कर्जाचे वाटप ही योजना महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळामार्फत राबविण्यात येते. या योजनेतील लाभाची पडताळणी करण्याकरीता आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या एकात्मिक क्षेत्र विकास कार्यक्रम कक्षाकडून मूल्यमापन पाहणी करण्यात आली.

खावटी कर्ज वाटप पाहणीसाठी गोंदिया, गडचिरोली, नंदूरबार व ठाणे जिल्हयाची निवड करण्यात आली. या चारही जिल्हयांच्या दहा तालुक्यांमधील २९ गावे निवडली.

सदर मूल्यमापनासाठी कुटुंबातील सदस्यांची वैयक्तिक माहिती (पुरुष / स्त्री, वय, शिक्षण, कुटुंब प्रमुखाशी नाते) तसेच कुटुंबाचा प्रमुख / दुय्यम व्यवसाय, भूधारणा क्षेत्र, प्रमुख / दुय्यम व्यवसायापासून मिळणारे कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न, पशुधन, घराची स्थिती, कुटुंबास मिळालेला लाभ, आरोग्य विषयक माहिती, कर्ज परतफेड इ. माहिती घेण्यात आली.

खावटी कर्ज वाटप योजनेच्या लाभार्थ्यांची (जिल्हा, तालुका व गावनिहाय यादी) संबंधित उपप्रादेशिक कार्यालय, म. रा. सह. आदिवासी विकास महामंडळ यांचेकडून घेण्यात आली. खालील अधिकारी / कर्मचारी यांच्या पाहणी पथकाने खावटी कर्ज योजनेचा लाभ मिळालेल्या लाभधारकांना प्रत्यक्ष भेटून, विहीत पत्रकात माहिती घेतली.

**पथक**

| अ.क्र. | अधिकारी / कर्मचाऱ्याचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १. | श्रीमती ए. एस. काळे | उपसंचालक |
| २. | श्री. एस. एम. यादव | सांख्यिकी अधिकारी |
| ३. | श्री. पी. बी. कुदळे | संशोधन सहायक |
| ४. | श्री. ए. सी. गायकवाड | संशोधन सहायक |
| ५. | श्री. यु. एम. यादव | आरेखक |
| ६. | श्री. आर. एस. पवार | अन्वेषक |

*******

# प्रकरण - ३

## पृथ:करण
## ३.१ क्षेत्रीय पाहणी

या कार्यालयाकडून पाहणी करण्यात आलेल्या लाभधारकांची जिल्हा, तालुका, गांवनिहाय माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | जिल्हा | तालुका | गावाचे नाव | लाभार्थी संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. | गोंदिया | १) गोंदिया | १) चिरामणटोला | ३३ |
| | | | २) सावरी | १३ |
| | | | ३) परसवाडा | १ |
| | | २) सालेकसा | १) पाथरी | ९ |
| | | | २) लटोरी | ११ |
| | | ३) आमगाव | १) जंगीटोला | १४ |
| | | | २) बनियाटोला | ११ |
| २. | गडचिरोली | १) कुरखेडा | १) अरकतोंडी | ७ |
| | | | २) खरमतटोला | ५ |
| | | | ३) येरंडी | ३ |
| | | | ४) गोठणगाव | ४ |
| | | | ५) देऊळगाव | १३ |
| | | २) आरमोरी | १) ठाणेगाव | २१ |
| | | | २) डोंगरसावंगी | १३ |
| ३. | नंदूरबार | १) तळोदा | १) आमलाड | ६ |
| | | | २) चिनोदा | १४ |
| | | | ३) रेवानगर | १० |
| | | | ४) दलिलपूर | १ |
| | | २) अक्कलकुवा | १) डाब | ४ |
| | | | २) जमाना | ७ |
| | | | ३) सल्लीबार | ५ |
| | | | ४) मोलगी | १ |
| | | ३) अक्राणी | १) असली | ४ |
| | | | २) तलाई | ५ |

| अ.क्र. | जिल्हा | तालुका | गावाचे नाव | लाभार्थी संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| ४. | ठाणे | | १) कुडुस | ६ |
| | | | २) गातेस (बु.) | १ |
| | | | ३) पोशिरे | ११ |
| | | २) तलासरी | १) उपलाट | २१ |
| | | | २) अनविर | ९ |
| | | | ३) सूत्रकार | ४ |
| **एकूण** | **४ जिल्हे** | **१० तालुके** | **२९ गावे** | **२६७ लाभार्थी** |

*******

## ३.२ लिंगभेदानुसार वर्गीकरण

खावटी कर्ज वाटप पाहणी केलेल्या आदिवासी जमातींच्या कुटुंबांचे लिंगभेदानुसार, जिल्हा, तालुका व गांवनिहाय वर्गीकरण पुढीलप्रमाणे असून, सदरची पाहणी ४ जिल्हयातील, १० तालुक्यांमधून, एकूण २९ गावांना प्रत्यक्ष भेट देऊन केलेली आहे.

**तक्ता क्र. १**

**खावटी कर्ज वाटप सर्वेक्षण केलेल्या आदिवासी लाभार्थी कुटूंबांतील लोकसंख्या**

| अ.क्र. | जिल्हा | तालुका | गावांची संख्या | लाभार्थ्यांची एकूण संख्या | लाभार्थ्यांच्या कुटुंबातील एकूण लोकसंख्या | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | पुरुष | स्त्रीया | एकूण |
| १. | गोंदिया | १) गोंदिया | ३ | ४७ | १२६ | १३५ | २६१ |
| | | २) सालेकसा | २ | २० | ५९ | ५२ | १११ |
| | | ३) आमगाव | २ | २५ | ६६ | ६० | १२६ |
| | | **एकूण :** | **७** | **९२** | **२५१** | **२४७** | **४९८** |
| २. | गडचिरोली | १) कुरखेडा | ५ | ३२ | ७१ | ७२ | १४३ |
| | | २) आरमोरी | २ | ३४ | ७९ | ६६ | १४५ |
| | | **एकूण :** | **७** | **६६** | **१५०** | **१३८** | **२८८** |
| ३. | नंदूरबार | १) तळोदा | ४ | ३१ | ८१ | ७० | १५१ |
| | | २) अक्कलकुवा | ४ | १७ | ५५ | ४० | ९५ |
| | | ३) अक्राणी | २ | ९ | २७ | २० | ४७ |
| | | **एकूण :** | **१०** | **५७** | **१६३** | **१३०** | **२९३** |
| ४. | ठाणे | १) वाडा | ३ | १८ | ४० | ३६ | ७६ |
| | | २) तलासरी | २ | ३४ | १०१ | ८६ | १८७ |
| | | **एकूण :** | **५** | **५२** | **१४१** | **१२२** | **२६३** |
| | **एकूण :** | **(१ ते ४ )** | **२९** | **२६७** | **७०५** | **६३७** | **१३४२** |

वरील तक्त्यावरुन असे दिसून येते की, गोंदिया व गडचिरोली या जिल्हयातील लाभार्थी कुटुंबांच्या लोकसंख्येमध्ये दर हजार पुरुषांमागे स्त्रियांचे प्रमाण अनुक्रमे ९८४ व ९२० आहे. तर सन २००१ च्या जनगणनेनुसार आदिवासी लोकसंख्येतील गोंदिया व गडचिरोली जिल्हयाचे दर हजार पुरुषांमागे स्त्रियांचे प्रमाण अनुक्रमे १०२० व ९८७ असे आहे.

नंदूरबार व ठाणे जिल्हयामध्ये लाभार्थी कुटुंबांच्या लोकसंख्येमध्ये दर हजार पुरुषांमागे स्त्रियांचे प्रमाण ७९८ व ८६५ असे आहे. परंतु सन २००१ च्या जनगणनेनुसार १००९ व ९९६ असे आहे.

सर्वेक्षण केलेल्या ४ ही जिल्हयातीलआदिवासी जमातींच्या कुटुंब आकाराचा विचार करता, गोंदिया जिल्हयात कुटुंबाचा सरासरी आकार ५.४१आहे. तर गडचिरोली - ४.३६, नंदूरबार - ५.१४ व ठाणे - ५.०५ असा आहे.यावरुन असे दिसून येते की, गोंदिया जिल्हयात कुटुंबाचा आकार हा इतर ३ जिल्हयापेक्षा (गडचिरोली, नंदूरबार व ठाणे) थोडा जास्त आहे. तर गडचिरोली जिल्हयातील सर्वेक्षण केलेल्या लाभार्थी कुटूंबांचा आकार इतर ३ जिल्हयांपेक्षा कमी आहे.

*******

## ३.३ जमातनिहाय वर्गीकरण

गोंदिया, गडचिरोली, नंदूरबार व ठाणे जिल्हयातील खावटी कर्ज वाटपाचे सर्वेक्षण केलेल्या आदिवासी लाभार्थ्यांचे जमातनिहाय वर्गीकरण खालीलप्रमाणे आहे.

### तक्ता क्र. ३.३(अ)

### खावटी कर्ज वाटप सर्वेक्षण केलेल्या आदिवासी लाभार्थ्यांचे जमातनिहाय वर्गीकरण

| अ. क्र. | जिल्हा | तालुका | गाव संख्या | लाभार्थी संख्या | जमातनिहाय वर्गीकरण | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | गोंड | माना | हलबी | भिल | पावरा | पाडवी | वारली | मल्हार कोळी |
| १. | गोंदिया | गोंदिया | ३ | ४७ | ३४ | - | १३ | - | - | - | - | - |
| | | सालेकसा | २ | २० | १ | - | १९ | - | - | - | - | - |
| | | आमगाव | २ | २५ | ११ | - | १४ | - | - | - | - | |
| | **एकूण** | | **७** | **९२** | **४६** | **-** | **४६** | **-** | **-** | **-** | **-** | **-** |
| २. | गडचिरोली | कुरखेडा | ५ | ३२ | ३१ | - | १ | - | - | - | - | - |
| | | आरमोरी | २ | ३४ | २१ | १३ | - | - | - | - | - | - |
| | **एकूण** | | **७** | **६६** | **५२** | **१३** | **१** | **-** | **-** | **-** | **-** | **-** |
| ३. | नंदूरबार | तळोदा | ४ | ३१ | - | - | - | २० | ११ | - | - | - |
| | | अक्कलकुवा | ४ | १७ | - | - | - | १२ | - | ५ | - | - |
| | | अक्राणी | २ | ९ | - | - | - | ८ | १ | - | - | - |
| | **एकूण** | | **१०** | **५७** | **-** | **-** | **-** | **४०** | **१२** | **५** | **-** | **-** |
| ४. | ठाणे | वाडा- | ३ | १८ | - | - | - | - | - | - | १३ | ५ |
| | | तलासरी | २ | ३४ | - | - | - | - | - | - | ३४ | - |
| | **एकूण** | | **५** | **५२** | **-** | **-** | **-** | **-** | **-** | **-** | **४७** | **५** |

### तक्ता क्र. ३.३(ब)

### खावटी कर्ज वाटप सर्वेक्षण केलेल्या आदिवासी लाभार्थ्यांचे जिल्हानिहाय वर्गीकरण

| अ. क्र. | जिल्हा | गाव संख्या | लाभार्थी | जमात निहाय वर्गीकरण | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | गोंड | माना | हलबी | भिल | पावरा | पाडवी | वारली | मल्हार कोळी |
| १. | गोंदिया | ७ | ९२ | ४६ | - | ४६ | - | - | - | - | - |
| २. | गडचिरोली | ७ | ६६ | ५२ | १३ | १ | - | - | - | - | - |
| ३. | नंदूरबार | १० | ५७ | - | - | - | ४० | १२ | ५ | - | - |
| ४. | ठाणे | ५ | ५२ | - | - | - | - | - | - | ४७ | ५ |
| | **एकूण जिल्हे : (गोंदिया,गडचिरोली, नंदूरबार व ठाणे)** | **२९** | **२६७** | **९८** | **१३** | **४७** | **४०** | **१२** | **५** | **४७** | **५** |

खावटी कर्ज वाटप सर्वेक्षण केलेल्या गोंदिया, गडचिरोली, नंदूरबार व ठाणे या ४ जिल्हयातील लाभधारकांचे आदिवासी जमातनिहाय वर्गीकरण पुढीलप्रमाणे आहे.

अ) गोंदिया जिल्हयामध्ये ३ तालुक्यातील ७ गावांमधील खावटी कर्ज वाटप केलेल्यापैकी ९२ लाभधारकांचे सर्वेक्षण करण्यात आले. लाभधारकांचे आदिवासी जमातनिहाय वर्गीकरण खालीलप्रमाणे आहे.

एकूण ९२ लाभार्थीपैकी ५०% (४६) लाभार्थी गोंड या आदिवासी जमातीचे आहेत तर ५०% (४६) लाभार्थी हलबी या आदिवासी जमातीचे आहेत.

ब) गडचिरोली या जिल्हयामध्ये २ तालुक्यातील ७ गावांमध्ये खावटी कर्ज वाटप केलेल्या पैकी ६६ लाभधारकाचे सर्वेक्षण करण्यात आले. या लाभधारकांचे आदिवासी जमातनिहाय वर्गीकरण खालीलप्रमाणे आहे.

एकूण ६६ लाभार्थ्यांपैकी गोंड या आदिवासी जमातीचे एकूण ७९% (५२) लाभधारक आहेत तर माना या आदिवासी जमातीचे २०%(१३) लाभधारक आहेत व १% (१) लाभधारक हलबा या आदिवासी जमातीचे आहेत.

क) नंदूरबार जिल्हयामध्ये ३ तालुक्यातील १० गावांमधील खावटी कर्ज वाटप केलेल्यापैकी ५७ लाभधारकांचे सर्वेक्षण करण्यात आले. या लाभधारकांचे आदिवासी जमातनिहाय वर्गीकरण खालीलप्रमाणे आहे.

एकूण ५७ लाभधारकांपैकी भिल्ल या आदिवासी जमातीचे ७०%(४०) लाभधारक आहेत. २१% (१२) लाभधारक पावरा या आदिवासी जमातीचे आहेत तर उर्वरीत ९% (५) लाभधारक पाडवी या आदिवासी समाजाचे आहेत.


ड) ठाणे जिल्हयामध्ये २ तालुक्यातील ५ गावांमध्ये खावटी कर्ज वाटप केलेल्यापैकी ५२ लाभधारकांचे सर्वेक्षण करण्यात आले असून, लाभधारकांचे आदिवासी जमातनिहाय वर्गीकरण खालीलप्रमाणे आहे.

एकूण ५२ लाभार्थ्यांपैकी ९०% (४७) लाभार्थी वारली या आदिवासी जमातीचे आहेत तर १०% (५) लाभार्थी मल्हारकोळी या आदिवासी जमातीचे आहेत.

खावटी कर्ज वाटप सर्वेक्षण करण्यात आलेल्या ४ जिल्हयातील एकूण २६७ लाभधारक हे आदिवासी जमातीच्या वेगवेगळया जमातीमधील आहेत या लाभधारकांची जमातनिहाय स्थिती पुढील आलेखाव्दारे दाखविण्यात आलेली आहे.

## तक्ता क्र. ३.३(क)
## खावटी कर्ज वाटप सर्वेक्षण केलेल्या आदिवासी लाभधारकांची जमातनिहाय टक्केवारी

| अ.क्र. | जमातीचे नांव | एकूण लाभार्थी | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | गोंड | ९८ | ३७ |
| २. | हलबी | ४७ | १८ |
| ३. | माना | १३ | ५ |
| ४. | भिल्ल | ४० | १५ |
| ५. | पावरा | १२ | ४ |
| ६. | पाडवी | ५ | २ |
| ७. | वारली | ४७ | १७ |
| ८. | मल्हार कोळी | ५ | २ |
| | **एकूण** | **२६७** | **१००** |




*******

## ३.४ साक्षरता

गोंदिया, गडचिरोली, नंदूरबार व ठाणे या ४ जिल्हयातील खावटी कर्ज वाटप योजनेच्या २६७ लाभार्थी कुटुंबांचे सर्वेक्षण केले असता, त्यांच्यामधील साक्षरतेचे प्रमाण खाली दर्शविल्याप्रमाणे आहे.

### तक्ता क्र. ३.४(अ)

**खावटी कर्ज वाटप सर्वेक्षण केलेल्या आदिवासी लाभार्थी कुटूंबांतील सदस्यांची साक्षर/निरक्षर माहिती**

| अ. क्र. | जिल्हा | तालुका | गावे एकूण संख्या | लाभार्थी एकूण संख्या | एकूण लोक संख्या | साक्षर | | निरक्षर | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | पुरुष | स्त्री | पुरुष | स्त्री |
| १. | गोंदिया | गोंदिया | ३ | ४७ | २६१ | ९४ | ७३ | ३२ | ६२ |
| | | सालेकसा | २ | २० | १११ | ४६ | ३४ | १३ | १८ |
| | | आमगाव | २ | २५ | १२६ | ५८ | ३६ | ८ | २४ |
| | **एकूण** | | **७** | **९२** | **४९८** | **१९८** | **१४३** | **५३** | **१०४** |
| २. | गडचिरोली | कुरखेडा | ५ | ३२ | १४३ | ४४ | २८ | २७ | ४४ |
| | | आरमोरी | २ | ३४ | १४५ | ४६ | २० | ३३ | ४६ |
| | **एकूण** | | **७** | **६६** | **२८८** | **९०** | **४८** | **६०** | **९०** |
| ३. | नंदूरबार | तळोदा | ४ | ३१ | १५१ | ४१ | २४ | ४० | ४६ |
| | | अक्कलकुवा | ४ | १७ | ९५ | २७ | २६ | २८ | १४ |
| | | अक्राणी | २ | ९ | ४७ | १६ | ३ | ११ | १७ |
| | **एकूण** | | **१०** | **५७** | **२९३** | **८४** | **५३** | **७९** | **७७** |
| ४. | ठाणे | वाडा | ३ | १८ | ७६ | २६ | १४ | १४ | २२ |
| | | तलासरी | २ | ३४ | १८७ | ७० | ४१ | ३१ | ४५ |
| | **एकूण** | | **५** | **५२** | **२६३** | **९६** | **५५** | **४५** | **६७** |

### तक्ता क्र. ३.४(ब)

**खावटी कर्ज वाटप सर्वेक्षण केलेल्या लाभार्थी कुटूंबांतील साक्षर/निरक्षर - सदस्यांची जिल्हानिहाय माहिती**

| अ. क्र. | जिल्हा | तालुका | गावे एकूण संख्या | लाभार्थी एकूण संख्या | एकूण लोक संख्या | साक्षर | | निरक्षर | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | पुरुष | स्त्री | पुरुष | स्त्री |
| १. | गोंदिया | ३ | ७ | ९२ | ४९८ | १९८ | १४३ | ५३ | १०४ |
| २. | गडचिरोली | २ | ७ | ६६ | २८८ | ९० | ४८ | ६० | ९० |
| ३. | नंदूरबार | ३ | १० | ५७ | २९३ | ८४ | ५३ | ७९ | ७७ |
| ४. | ठाणे | २ | ५ | ५२ | २६३ | ९६ | ५५ | ४५ | ६७ |
| **एकूण (४) जिल्हे:** | | **१०** | **२९** | **२६७** | **१३४२** | **४६८** | **२९९** | **२३७** | **३३८** |

अ) वरील तक्त्याचे अवलोकन केले असता, गोंदिया जिल्हयातील खावटी कर्ज वाटप योजनेचे सर्वेक्षण केलेल्या लाभार्थी कुटुंबातील सदस्यांचे साक्षरतेचे प्रमाण एकूण ६८% व निरक्षरतेचे प्रमाण ३२% असल्याचे दिसून येते. यापैकी पुरुष साक्षरता प्रमाण ७९% व पुरुष निरक्षरता प्रमाण २१% तर स्त्री साक्षरता प्रमाण ५८ % व स्त्रियांचे निरक्षरता प्रमाण ४२ % आहे.

ब) गडचिरोली जिल्हयातील सर्वेक्षण केलेल्या एकूण ६६ लाभार्थी कुटुंबातील सदस्यांचे साक्षरतेचे प्रमाण ५२% तर निरक्षरतेचे प्रमाण ४८% आहे. यातील पुरुष साक्षरतेचे प्रमाण ६०% तर पुरुष निरक्षरतेचे प्रमाण ४०% असून, स्त्री यांचे साक्षरतेचे प्रमाण ३५ % तर स्त्रियांचे निरक्षरतेचे प्रमाण ६५ % आहे.

क) नंदूरबार जिल्हयातील सर्वेक्षण केलेल्या ५७ लाभार्थी कुटुंबातील सदस्यांचे साक्षरता प्रमाण ४७% तर निरक्षरता प्रमाण ५३% असून, पुरुष साक्षरता प्रमाण ५२% व पुरुष निरक्षरता प्रमाण ४८% आहे. स्त्री साक्षरता प्रमाण ४१% व स्त्रियांचे निरक्षरता प्रमाण ५९% आहे.

ड) सर्वेक्षण केलेल्या ठाणे जिल्हयातील ५२ लाभार्थी कुटुंबातील सदस्यांचे साक्षरतेचे प्रमाण ५७% तर निरक्षरतेचे प्रमाण ४३% आहे. यामध्ये पुरुष साक्षरता प्रमाण ६८% व पुरुष निरक्षरता प्रमाण ३२% असून, लाभार्थी कुटुंबातील स्त्रियांचे साक्षरतेचे प्रमाण ४५% व स्त्रियांचे निरक्षरतेचे प्रमाण ५५% आहे.

यावरुन असे निदर्शनास येते की, सर्वेक्षण केलेल्या गोंदिया, गडचिरोली, नंदूरबार व ठाणे या ४ जिल्हयातील लाभार्थी कुटुंबातील एकूण साक्षरता प्रमाण गोंदिया जिल्हयात जास्त म्हणजे ६८% व गडचिरोली जिल्हयात कमी म्हणजेच ४७% आहे. तर निरक्षरता प्रमाण गडचिरोली जिल्हयात जास्त म्हणजेच ५३% आहे. व गोंदिया जिल्हयात कमी म्हणजेच ३२% आहे.


गोंदिया, गडचिरोली, नंदूरबार व ठाणे जिल्हयातील खावटी कर्ज वाटप सर्वेक्षण केलेल्या ४ ही जिल्हयातील लाभार्थी कुटुंबातील एकूण पुरुष साक्षरता प्रमाण गोंदिया जिल्हयात सर्वात जास्त म्हणजे ७९% आहे तर गडचिरोली जिल्हयात कमी म्हणजेच ५२% आहे.

वरील ४ ही जिल्हयातील लाभार्थी कुटूंबांतील स्त्रियांचे एकूण साक्षरता प्रमाण गोंदिया जिल्हयात सर्वांत जास्त म्हणजे ५८ % तर स्त्रियांचे साक्षरता प्रमाण गडचिरोली जिल्हयात कमी म्हणजेच ३५% आहे.

सर्वेक्षण केलेल्या ४ ही जिल्हयातील लाभार्थी कुटूंबांतील सदस्यांचे निरक्षरतेचे प्रमाण पाहता गडचिरोली जिल्हयात ४८% पुरुष निरक्षर आहेत तर गोंदिया जिल्हयात फक्त २१% पुरुष (लाभार्थी कुटूंबांतील) निरक्षर आहेत.

तर या चारही जिल्हयातील सर्वेक्षण केलेल्या कुटूंबांतील निरक्षर सदस्याबाबत स्त्रियांचे बाबत गडचिरोलीमध्ये ६५% म्हणजेच जास्त निरक्षरता आहे तर गोंदिया जिल्हयात कमी म्हणजेच ४२% स्त्रिया निरक्षर आहेत.

**खावटी कर्ज वाटप सर्वेक्षण केलेल्या आदिवासी लाभार्थी कुटूंबांतील साक्षर व निरक्षर - सदस्य दर्शविणारा आलेख**




*******

## ३.५ शैक्षणिक स्तर

खावटी कर्ज वाटप सर्वेक्षण केलेल्या ४ जिल्हयातील लाभार्थी कुटूंबांची शैक्षणिक स्थिती पुढीलप्रमाणे आहे.

**तक्ता क्र. ३.५(अ)**

**खावटी कर्ज वाटप सर्वेक्षण केलेल्या आदिवासी कुटूंबांतील सदस्याची शैक्षणिक पात्रता वर्गीकरण**

| अ. क्र. | जिल्हा | तालुका | शैक्षणिक वर्गीकरण | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | इ.१ ते ४ | इ.५ ते ७ | इ.८ ते १० | इ.११ ते १२ | डी. एड | एस.वाय .बी.ए. | बी.ए. ड. | एकूण |
| १. | गोंदिया | गोंदिया | ५१ | ३४ | ५४ | २५ | ३ | - | - | १६७ |
| | | सालेकसा | २१ | १८ | ३२ | ९ | - | - | - | ८० |
| | | आमगांव | ३४ | २६ | ३० | ४ | - | - | - | ९४ |
| | **एकूण** | | **१०६** | **७८** | **११६** | **३८** | **३** | **-** | **-** | **३४१** |
| २. | गडचिरोली | कुरखेडा | २२ | १२ | २७ | ९ | - | - | २ | ७२ |
| | | आरमोरी | २० | ११ | २५ | ७ | - | - | ३ | ६६ |
| | **एकूण** | | **४२** | **२३** | **५२** | **१६** | **-** | **-** | **५** | **१३८** |
| ३. | नंदूरबार | तळोदा | २२ | १३ | १४ | १३ | १ | २ | - | ६५ |
| | | अक्कलकुवा | १६ | ९ | २१ | ७ | - | - | - | ५३ |
| | | अक्राणी | ७ | ४ | २ | ५ | - | १ | - | १९ |
| | **एकूण** | | **४५** | **२६** | **३७** | **२५** | **१** | **३** | **-** | **१३७** |
| ४. | ठाणे | वाडा | १३ | ११ | १२ | ४ | - | - | - | ४० |
| | | तलासरी | २८ | ४६ | ३१ | ५ | - | १ | - | १११ |
| | **एकूण** | | **४१** | **५७** | **४३** | **९** | **-** | **१** | **-** | **१५१** |

**तक्ता क्र. ३.५(ब)**

**खावटी कर्ज वाटप सर्वेक्षण केलेल्या आदिवासी कुटूंबांतील सदस्याची शैक्षणिक पात्रता जिल्हानिहाय वर्गीकरण**

| अ. क्र. | जिल्हा | तालुका | शैक्षणिक वर्गीकरण | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | इ.१ ते ४ | इ.५ ते ७ | इ.८ ते १० | इ.११ ते १२ | डी.ए ड. | एस.वाय. बी.ए. | बी.ए. ड. | एकूण |
| १. | गोंदिया | ३ | १०६ | ७८ | ११६ | ३८ | ३ | - | - | ३४१ |
| २. | गडचिरोली | २ | ४२ | २३ | ५२ | १६ | - | - | ५ | १३८ |
| ३. | नंदूरबार | ३ | ४५ | २६ | ३७ | २५ | १ | ३ | - | १३७ |
| ४. | ठाणे | २ | ४१ | ५७ | ४३ | ९ | - | १ | - | १५१ |
| | एकूण | १० | २३४ | १८४ | २४८ | ८८ | ४ | ४ | ५ | ७६७ |

अ) गोंदिया जिल्हयातील सदर सर्वेक्षण केलेल्या ३ तालुक्यातील एकूण ९२ लाभार्थी कुटूंबांतील सदस्यांच्या शैक्षणिक स्थितीचा विचार करता एकूण ३४१ शिक्षित सदस्य आहेत. त्यापैकी ३१% सदस्यांनी (१०६) इयत्ता १ ते ४ पर्यंत शिक्षण घेतलेले आहे, २३% (७८) सदस्यांचे इयत्ता ५ वी ते ७ पर्यंत शिक्षण पूर्ण झालेले आहे. ३४% (११६) सदस्यांचे शिक्षण इयत्ता ८ वी ते १० वी पर्यंत पूर्ण झालेले आहे. इयत्ता ११ वी ते १२ पर्यंत ११% (३८) सदस्यांचे शिक्षण झालेले आहे तर डी.एड पदविका पूर्ण करणारे १% (३) सदस्य सदर लाभार्थी कुटूंबांत आहेत.

ब ) गडचिरोली जिल्हयातील खावटी कर्ज वाटप सर्वेक्षण केलेल्या २ तालुक्यातील एकूण ६६लाभार्थी कुटूंबांतील सदस्यांची शैक्षणिक स्थिती खालीलप्रमाणे आहे. एकूण १३८ शिक्षित सदस्य आहेत त्यापैकी ३०% (४२) सदस्यांनी इयत्ता १ ते ४ थी पर्यंत शिक्षण घेतलेले आहे, १७% (२३) सदस्यांनी इयत्ता ५ वी ते ७ वी पर्यंत शिक्षण घेतलेले आहे. ३८% (५२) सदस्यांनी इयत्ता ८ वी ते १० वी पर्यंत शिक्षण घेतलेले आहे तर ११% (१६) सदस्यांनी इयत्ता ११ ते १२ वी पर्यंत शिक्षण पूर्ण केलेले आहे तर या एकूण ६६ लाभार्थी कुटूंबांतील ४% (५) सदस्य बी.एड. पूर्ण केलेले आहेत म्हणजेच आदिवासी जमातीमध्ये शिक्षणाचे महत्व वाढू लागल्याचे हे द्योतक मानावे लागेल.

क) नंदूरबार जिल्हयातील खावटी कर्ज वाटप सर्वेक्षण पूर्ण केलेल्या एकूण ३ तालुक्यातील एकूण ५२ लाभार्थी कुटूंबातील सदस्याची शैक्षणिक स्थिती खालीलप्रमाणे आहे. सर्वेक्षण केलेल्या एकूण ३ तालुक्यातील १० गावांमधील ५७ लाभार्थी कुटूंबामध्ये एकूण १३७ सदस्य शिक्षित आहेत. त्यामध्ये इयत्ता १ ली ते ४ थी पर्यंत शिक्षण झालेले एकूण ३३% (४५) सदस्य आहेत. इयत्ता ५ वी ते ७ वी पर्यंत शिक्षण पूर्ण केलेले १९% (२६) सदस्य आहेत, इयत्ता ८ वी ते १० पर्यंत शिक्षण घेतलेले २७% (३७) सदस्य आहेत, इयत्ता ११ वी ते १२ पर्यंत शिक्षण घेतलेले १८% (२५) सदस्य आहेत, डी.एड. पदविका पूर्ण केलेले १% (१) सदस्य आहेत तर एस.वाय.बी.ए पर्यंत शिक्षण घेतलेले २% (३) सदस्य आहेत.

ड) ठाणे जिल्हयातील सर्वेक्षण पूर्ण केलेल्या एकूण २ तालुक्यातील ५ गावांतील ५२ लाभार्थी कुटूंबातील सदस्यांचा शैक्षणिकस्तर पुढीलप्रमाणे आहे.

इयत्ता १ ली ते ४ थी पर्यंत शिक्षण पूर्ण झालेले २७% (४१) सदस्य आहेत. इयत्ता ५ वी ते ७ थी पर्यंत शिक्षण घेतलेले ३८% (५७) सदस्य आहेत, इयत्ता ८ वी ते १० वी पर्यंत शिक्षण घेतलेले २८% (४३) सदस्य आहेत, इयत्ता ११ वी ते १२ वी पर्यंत शिक्षण पूर्ण झालेले ६% (९) सदस्य आहेत तर एस.वाय.बी.ए. पर्यंत शिक्षण घेतलेले १% (१) सदस्य आहेत.

एकंदरीत खावटी कर्ज वाटप सर्वेक्षण केलेल्या ४ ही जिल्हयामधील एकूण लाभार्थी कुटूंबातील १३४२ लोकसंख्येपैकी ७६७ (स्त्री + पुरुष) म्हणजेच ५७% सदस्य शिक्षित आहेत. आश्रमशाळेसह सुरु झालेल्या शिक्षण पध्दतीमुळे आदिवासी जमातीमध्ये शिक्षित समाजाचे प्रमाण वाढीस लागले असल्याचे दिसून येते.

*******

## ३.६ खावटी कर्ज वाटप लाभार्थी जमीनधारणा

गोंदिया, गडचिरोली, नंदूरबार व ठाणे या ४ जिल्हयातील एकूण १० तालुक्यातील २९ गावांमध्ये खावटी कर्ज वाटप लाभार्थ्यांचे सर्वेक्षण केले असून त्यांचेकडे असलेल्या जमीन धारणेबाबतची माहिती खालीलप्रमाणे आहे.

**तक्ता क्र. ३.६(अ)**

**खावटी कर्ज वाटप सर्वेक्षण केलेल्या आदिवासी लाभार्थींचे (जिरायत/बागायत) क्षेत्रानुसार वर्गीकरण**


| अ. क्रं. | जिल्हा | तालुका | गांवाची लोक-संख्या | एकूण लाभधारक | पैकी | जिरायत क्षेत्रानुसार लाभार्थ्यांचे वर्गीकरण | | | | एकूण | बागायत क्षेत्रानुसार लाभार्थ्यांचे वर्गीकरण | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | भूमीहीन लाभधारक | ० ते १ (एकर) | १ ते २ (एकर) | २ ते ३ (एकर) | ३ एकराचे वर | | ० ते १ (एकर) | १ ते २ (एकर) | २ ते ३ (एकर) | ३ एकराचे वर | एकूण |
| १. | गोंदिया | गोंदिया | ३ | ४७ | ११ | १६ | १६ | १ | १ | ३४ | २ | - | - | - | २ |
| | | सालेकसा | २ | २० | ४ | ५ | ६ | २ | - | १३ | १ | २ | - | - | ३ |
| | | आमगांव | २ | २५ | ३ | ५ | ८ | ३ | २ | १८ | २ | २ | - | - | ४ |
| | **एकूण** | | **७** | **९२** | **१८** | **२६** | **३०** | **६** | **३** | **६५** | **५** | **४** | **-** | **-** | **९** |
| २. | गडचिरोली | कुरखेडा | ५ | ३२ | ८ | ७ | १० | २ | ३ | २२ | - | २ | - | - | २ |
| | | आरमोरी | २ | ३४ | १९ | ३ | ९ | १ | २ | १५ | - | - | - | - | - |
| | **एकूण** | | **७** | **६६** | **२७** | **१०** | **१९** | **३** | **५** | **३७** | **-** | **२** | **-** | **-** | **२** |
| ३. | नंदूरबार | तळोदा | ४ | ३१ | १४ | - | ३ | ३ | - | ६ | - | १ | २ | ८ | ११ |
| | | अक्कलकुवा | ४ | १७ | ६ | - | ३ | ५ | ११ | - | - | - | - | - | - |
| | | अक्राणी | २ | ९ | ४ | - | - | १ | ४ | ५ | - | - | - | - | - |
| | **एकूण** | | **१०** | **५७** | **२४** | **-** | **६** | **७** | **९** | **२२** | **-** | **१** | **२** | **८** | **११** |
| ४. | ठाणे | वाडा | ३ | १८ | १४ | १ | ३ | - | - | ४ | - | - | - | - | - |
| | | तलासरी | २ | ३४ | ४ | ९ | १२ | ४ | ३ | २८ | १ | १ | - | - | २ |
| | **एकूण** | | **५** | **५२** | **१८** | **१०** | **१५** | **४** | **३** | **३२** | **१** | **१** | **-** | **-** | **२** |

## तक्ता क्र. ३.६(ब)


## खावटी कर्ज वाटप सर्वेक्षण केलेल्या आदिवासी लाभार्थींचे क्षेत्रानुसार जिल्हानिहाय वर्गीकरण

| अ. क्रं. | जिल्हा | तालुका | गांवाची लोक संख्या | एकूण लाभधारक | पैकी | जिरायत क्षेत्रानुसार लाभार्थ्यांचे वर्गीकरण | | | | एकूण | बागायत क्षेत्रानुसार लाभार्थ्यांचे वर्गीकरण | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | भूमीहीन लाभधारक | ० ते १ (एकर) | १ ते २ (एकर) | २ ते ३ (एकर) | ३ एकराचे वर | | ० ते १ (एकर) | १ ते २ (एकर) | २ ते ३ (एकर) | ३ एकराचे वर | एकूण |
| १. | गोंदिया | गोंदिया | ७ | ९२ | १८ | २६ | ३० | ६ | ३ | ६५ | ५ | ४ | - | - | ९ |
| २. | गडचिरोली | कुरखेडा | ७ | ६६ | २७ | १० | १९ | ३ | ५ | ३७ | - | २ | - | - | २ |
| ३. | नंदूरबार | तळोदा | १० | ५७ | २४ | - | ६ | ७ | ९ | २२ | - | १ | २ | ८ | ११ |
| ४. | ठाणे | वाडा | ५ | ५२ | १८ | १० | १५ | ४ | ३ | ३२ | १ | १ | - | - | २ |
| | **एकूण** | | **२९** | **२६७** | **८७** | **४६** | **७०** | **२०** | **२०** | **१५६** | **६** | **८** | **२** | **८** | **२४** |

**खावटी कर्ज वाटप सर्वेक्षण केलेल्या आदिवासी लाभार्थींचे, भूमिहिन व भूधारक लाभार्थी कुटूंबनिहाय वर्गीकरण**




**खावटी कर्ज वाटप सर्वेक्षण केलेल्या आदिवासी लाभार्थींचे, जिरायत व बागायत क्षेत्रानुसार कुटूंबनिहाय वर्गीकरण**



अ) गोंदिया जिल्हयामध्ये एकूण ३ तालुक्यातील ७ गांवाचे खावटी कर्ज वाटपाचे सर्वेक्षण करण्यात आले. सर्वेक्षणाचे वेळी एकूण ३ तालुक्यांमध्ये ९२ लाभार्थ्यांची माहिती संकलीत करण्यात आली. यापैकी एकूण १८ लाभधारक भूमिहीन आहेत. तर उर्वरित ७४ लाभधारक भूधारक असून त्यांचेकडे असणा-या जमिनीची विभागणी खालीलप्रमाणे आहे. जिरायत क्षेत्र असणारे ० ते १ एकर २६ लाभधारक १ ते २ एकर ३० लाभधारक, २ ते ३ एकर ६ लाभधारक तसेच ३ एकरावरील क्षेत्र असणारे ३ लाभधारक आहेत. ० ते १ एकर बागायत क्षेत्र असणारे ५ लाभधारक व १ ते २ एकर बागायत क्षेत्र असणारे ४ लाभधारक अशी विभागणी होत असून आदिवासी जमातींकडे अति अल्प भूधारक क्षेत्र आहे असे दिसून येते. एकूण अति अल्प भूधारक क्षेत्र आहे असे दिसून येते. एकूण९२ लाभधारकांपैकी ३०% (१८) लाभधारक भूमिहीन आहेत तर उर्वरित ७४ लाभधारकापैकी १२%(९) लाभधारक बागायत क्षेत्र धारक आहेत. उर्वरित ८८% लाभधारक (६५) जिरायत क्षेत्र धारण करणारे आहेत.

ब) गडचिरोली जिल्हयातील एकूण २ तालुक्यातील ७ गावांचे खावटी कर्ज वाटपाचे सर्वेक्षण पूर्ण करण्यात आले. सर्वेक्षणाचे वेळी ६६ लाभार्थीकडून माहिती संकलीत करण्यात आली. यापैकी २७ लाभधारक भूमिहीन आहेत तर उर्वरित ३९ लाभधारक भूधारक असून त्यांचेकडे असणा-या जमीनीची विभागणी खालीलप्रमाणे आहे. जिरायत क्षेत्र असणारे ० ते १ एकर १० लाभधारक, १ ते २ एकर जिरायत १९ लाभधारक, २ ते ३ एकर जिरायत ३ लाभधारक, ३ एकरावरील जिरायत क्षेत्र असणारे ५ लाभधारक आहेत तर बागायत क्षेत्र असणारे २ लाभधारक असून त्याचे क्षेत्र १ ते २ एकर या दरम्यान आहे. यापैकी दोन लाभधारकांनी शेती खंडानी घेतली आहे. म्हणजेच एकूण ६६ लाभधारकापैकी ४१% (२७) लाभधारक भूमिहीन आहेत तर उर्वरित ५९%(३९) लाभधारकांकडे जिरायत/बागायत जमिन आहे. या ३९ लाभधारकांपैकी ९५%(३७) लाभधारक जिरायत शेती असणारे आहेत तर केवळ ५% (२) लाभधारकांकडे बागायती शेती आहे.

शेतजमिन धारणेचा विचार केला असता सर्वेक्षण केलेल्या ६६ कुटूंबांपैकी २७ कुटूंबे भूमिहीन आहेत तर उर्वरित ३९ कुटूंबांकडे शेती आहे. परंतू शेती असणारे जवळपास सर्वच ३९ लाभधारक हे अल्पभूधारक आहेत.

क) नंदूरबार जिल्हयातील एकूण ३ तालुक्यातील १० गावांचे खावटी कर्ज वाटपाचे सर्वेक्षण करण्यात आले. सर्वेक्षणाचे वेळी या १० गावांमधील ५७ लाभधारकांकडून प्रपत्रे भरुन घेण्यात आली. यापैकी २४ लाभधारक भूमिहीन आहेत. तर उर्वरित ३३ लाभधारकांकडे शेती आहे. त्यांचेकडे असणा-या शेत जमीनीची विभागणी खालीलप्रमाणे आहे. १ ते २ एकर जिरायत क्षेत्र असणारे ६ लाभधारक आहेत. २ ते ३ एकर जिरायत क्षेत्र असणारे ७ लाभधारक आहेत. ३ एकराचेवर जिरायत शेती असणारे ९ लाभधारक आहेत. बागायत क्षेत्र असणारे लाभधारकांकडे पुढीलप्रमाणे जमिनीचे क्षेत्र आहे. १ ते २ एकरापर्यंत १ लाभधारक, २ ते ३ एकर बागायत क्षेत्र २ लाभधारक, ३ एकरांचे वर बागायत क्षेत्र असणारे ८ लाभधारक आहेत. म्हणजेच एकूण ३३ लाभधारकांकडे शेतजमिन आहे. यातील २२ म्हणजेच ६७% लाभधारकांकडे जिरायत शेती आहे तर उर्वरीत ३३% (११) लाभधारकांकडे बागायत शेती आहे. नंदूरबार जिल्हयातील सर्वेक्षण केलेल्या पैकी शेतजमिन असणारे जवळपास सर्वच लाभधारक अल्प भूधारक आहेत.

ड) ठाणे जिल्हयातील एकूण २ तालुक्यातील ५ गावांचे खावटी कर्ज वाटप लाभार्थ्यांचे सर्वेक्षण करण्यात आले या ५ गावांतील एकूण ५२ लाभार्थ्यांची प्रपत्रे भरलेली आहेत. यापैकी १८ लाभार्थी भूमिहीन आहेत व उर्वरित ३४ लाभार्थ्यांकडे शेतजमिन आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे. एकूण ३४ लाभार्थ्यांपैकी २ लाभार्थी बागायत शेतजमिन धारण करणारे आहेत. उर्वरित ३२ म्हणजेच ९४% लाभार्थ्यांकडे जिरायत शेतजमिन आहे, यापैकी ० ते १ एकर जिरायत क्षेत्र असणारे १० लाभधारक आहेत. १ ते २ एकर जिरायत क्षेत्र असणारे १५ लाभधारक आहेत, २ ते ३ एकर जिरायत क्षेत्र असणारे ४ लाभधारक आहेत तर ३ एकराचेवर जिरायत शेतजमीन असणारे ३ लाभार्थी आहेत. बागायत क्षेत्र असणारे २ लाभधारक आहेत. पैकी १ लाभार्थ्यांकडे १ एकरापर्यंत बागायत क्षेत्र आहे तर दुस-या लाभधारकाचे बागायत क्षेत्र २ एकरापर्यंत आहे.

एकूण ५२ लाभधारकांपैकी भूमिहीन लाभार्थी ३५% (१८) आहेत तर उर्वरीत ६५% (३४) लाभार्थ्यांकडे शेतजमीन आहे. ठाणे जिल्हयामध्ये खावटी कर्ज वाटप सर्वेक्षण केलेले व शेतजमीन असणारे जवळपास सर्व लाभधारक अल्प भूधारक आहेत.

खावटी कर्ज वाटप सर्वेक्षण गोंदिया, गडचिरोली, नंदूरबार व ठाणे या ४ जिल्हयातील १० तालुक्यातील व २९ गावांमधून एकूण २६७ लाभधारकांचे करण्यात आले. यामध्ये सरासरी ३३% (८७) लाभधारक भूमिहीन आहेत व उर्वरीत ६७% (१८०) लाभधारक शेतजमिन (बागायत/जिरायत) धारक आहेत. यापैकी जवळपास ८७% (१५६) लाभधारकांकडे जिरायत क्षेत्र आहे व उर्वरीत १३% (२४) लाभधारकांकडे बागायत शेतजमिन आहे. या ४ ही जिल्हयातील सदर सर्वेक्षणातील लाभधारकांच्या जमीनीच्या क्षेत्राचा विचार करता हे सर्वजन म्हणजेच १००% अल्पभूधारक असल्याचे दिसून येते.

*******

## ३.७ पशुधन

अ) खावटी कर्ज वाटप केलेल्या जिल्हयापैकी गोंदिया, गडचिरोली, नंदूरबार व ठाणे या ४ जिल्हयातील १० तालुक्यामधील २९ गावांमधून २६७ लाभधारकांची माहिती सर्वेक्षण करताना घेतली असता, त्यांचेकडे खालीलप्रमाणे पशुधन आहे.

### तक्ता क्र. ३.७(अ)
**खावटी कर्ज वाटप सर्वेक्षण केलेल्या आदिवासी लाभार्थ्यांकडे असलेल्या पशुधनाची माहिती दर्शविणारा तक्ता**

| अ. क्र. | जिल्हा | तालुका | गांव संख्या | लाभार्थी संख्या | पशुधन | | | | | | | | पशुधन नसलेले लाभार्थी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | गाय | | म्हैस | | रेडे | बैल | शेळया | कोंबडया | |
| | | | | | दुभती | भाकड | दुभती | भाकड | | | | | |
| १. | गोंदिया | गोंदिया | ३ | ४७ | १ | १ | - | २ | - | २२ | ६ | - | १४ |
| | | सालेकसा | २ | २० | ५ | २ | - | - | - | १९ | ५ | ३ | ११ |
| | | आमगांव | २ | २५ | १३ | १० | - | - | ६ | २९ | ११ | १४ | २१ |
| | **एकूण** | | **७** | **९२** | **१९** | **१३** | - | **२** | **६** | **७०** | **२२** | **१७** | **४६** |
| २. | गडचिरोली | कुरखेडा | ५ | ३२ | ७ | ८ | ३ | - | - | ३० | १५ | १७ | १७ |
| | | आरमोरी | २ | ३४ | - | ११ | - | - | - | २८ | ४ | ४ | १४ |
| | **एकूण** | | **७** | **६६** | **७** | **१९** | **३** | - | - | **५८** | **१९** | **२१** | **३१** |
| ३. | नंदूरबार | तळोदा | ४ | ३१ | १० | ८ | १ | ८ | ० | २६ | १५ | ६१ | १५ |
| | | अक्कलकुवा | ४ | १७ | ४ | ३ | १ | ५ | - | १५ | २५ | ४९ | १३ |
| | | अक्राणी | २ | ९ | ३ | १ | १ | - | - | ९ | ५ | १४ | ५ |
| | **एकूण** | | **१०** | **५७** | **१७** | **१२** | **३** | **१३** | - | **५०** | **४५** | **१२४** | **३३** |
| ४. | ठाणे | वाडा | ३ | १८ | - | २ | - | - | - | १३ | - | - | ३ |
| | | तलासरी | २ | ३४ | ६ | १० | - | - | - | ५० | २० | ८७ | २३ |
| | **एकूण** | | **५** | **५२** | **६** | **१२** | - | - | - | **६३** | **२** | **८७** | **२६** |

अ) गोंदिया जिल्हयातील, ३ तालुक्यातील ७ गावांमधील ९२ लाभार्थ्यांचे सर्वेक्षण केले असता त्यांचेकडे खालीलप्रमाणे पशुधन आहे. एकूण ९२ लाभार्थ्यांपैकी ४६ लाभधारकांकडे पशुधन आहे. त्यामध्ये ३२ गाई, २ म्हशी, ६ रेडे , ७० बैल, २२ शेळया व १७ कोंबडया एवढे पशुधन आहे. थोडक्यात ५०% (४६),लाभार्थ्यांकडे पशुधन आहे व तितक्याच म्हणजेच ९०%(४६) लाभार्थ्यांकडे पशुधन नाही व जे पशुधन आहे ते सुध्दा देशी जातीचे व हलक्या प्रतीचे आहे. त्यामध्ये संकरीत जातींचा समावेश नाही व देशी जातीच्या पशुधनापासून त्यांना विशेष उत्पन्न मिळत नाही.

ब) गडचिरोली जिल्हयातील २ तालुक्यातील ७ गावांमधील खावटी कर्ज वाटप केलेल्या लाभार्थ्यांपैकी ६६ लाभार्थ्यांची सर्वेक्षणाची पत्रके भरुन घेतली. सदर लाभार्थ्यांकडे खालीलप्रमाणे पशुधन आहे.

एकूण ६६ लाभार्थ्यांपैकी ३१ लाभार्थ्यांकडे पशुधन आहे. त्यामध्ये २६ गाई, ३ म्हशी, ५८ बैल, १९ शेळया व २१ कोंबडया आहेत. एकूण लाभार्थ्यांपैकी ४७% (३१) लाभार्थ्यांकडे पशुधन आहे व उर्वरीत ५३% (३५) लाभार्थ्यांकडे पशुधन नाही. बैलांचा उपयोग शेतीकामासाठी करण्यात येतो. परंतु जिरायत शेतीचे प्रमाण जास्त असल्यामुळे बैलजोडी सांभाळणे सुध्दा खर्चिक व जिकीरीचे आहे.

क) नंदूरबार जिल्हयातील ३ तालुक्यातील १० गावांमधील खावटी कर्ज वाटप केलेल्या लाभार्थ्यांपैकी ५७ लाभार्थ्यांची सर्वेक्षणाची पत्रके भरुन घेतली आहेत व त्यानुसार त्यांचेकडे खालीलप्रमाणे पशुधन आहे.

एकूण ५७ लाभार्थ्यांपैकी ३३ लाभार्थ्यांकडे पशुधन आहे. त्यामध्ये २९ गाई, १६ म्हशी, ५० बैल, ४५ शेळया व १२४ कोंबडया आहेत. एकूण ५७ लाभार्थींपैकी ३३ लाभार्थ्यांकडे पशुधन आहे म्हणजेच ५३%(३३) लाभार्थ्यांकडे पशुधन आहे. व उर्वरीत ४७% (२४) लाभार्थ्योंकडे पशुधन नाही. तळोदा तालुक्यातील लाभधारकांकडे संकरीत गाईचे प्रमाण जास्त आहे त्यामुळे त्यांना दुध व्यवसायापासून ब-यापैकी उत्पन्न मिळत आहे.

ड) ठाणे जिल्हयातील २ तालुक्यातील ५ गावांमधून खावटी कर्ज वाटप केलेल्या लाभार्थ्यांपैकी ५२ लाभार्थ्यांची पत्रके भरुन घेतली. सदर लाभधारकांकडे खालीलप्रमाणे पशुधन आहे. एकूण ५२ लाभार्थ्यांपैकी २६ लाभार्थ्यांकडे पशुधन आहे. म्हणजेच ५०% लाभार्थ्यांकडे पशुधन आहे व उर्वरित ५०%(२६) लाभार्थ्यांकडे पशुधन नाही. १८ गाई, ६३ बैल, २ शेळया व ८७ कोंबडया याप्रमाणे पशुधन आहे. या लाभार्थ्यांकडे असणारे देशी जातीची जनावरे असल्यामुळे त्यांचे पासुन उत्पन्न फार कमी प्रमाणात मिळते. एकूण ५२ लाभार्थ्यांपैकी १८ म्हणजेच ३५% लाभार्थी भूमिहीन आहेत.

## तक्ता क्र. ३.७(ब)

### खावटी कर्ज वाटप सर्वेक्षण केलेल्या आदिवासी लाभार्थ्यांकडे असलेल्या पशुधनाची जिल्हानिहाय माहिती

| अ. क्र. | जिल्हा | तालुक्याची संख्या | गांव संख्या | लाभार्थी संख्या | पशुधन | | | | | | | | पशुधन नसलेले लाभार्थी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | गाय | | म्हैस | | रेडे | बैल | शेळया | कोंबडया | |
| | | | | | दुभती | भाकड | दुभती | भाकड | | | | | |
| १. | गोंदिया | ३ | ७ | ९२ | १९ | १३ | - | २ | ६ | ७० | २२ | १७ | ४६ |
| २. | गडचिरोली | २ | ७ | ६६ | ७ | १९ | ३ | - | - | ५८ | १९ | २१ | ३१ |
| ३. | नंदूरबार | ३ | १० | ५७ | १७ | १२ | ३ | १३ | - | ५० | ४५ | १२४ | ३३ |
| ४. | ठाणे | २ | ५ | ५२ | ६ | १२ | - | - | - | ६३ | २ | ८७ | २६ |
| **एकूण** | | **१०** | **२९** | **२६७** | **४९** | **५६** | **६** | **१५** | **६** | **२४१** | **८८** | **२४९** | **१३६** |

एकंदरीत ४ ही जिल्हयातील लाभधारकांचा विचार करता २६७ लाभधारकापैकी ५१% (१३६) लाभधारकांकडे पशुधन नाही. त्यामुळे त्यांना दुय्यम व्यवसायापासून काहीही उत्पन्न नाही. तसेच उपलब्ध असणारे बहुतांशी पशुधन हे देशी जातीचे व हलक्या प्रतीचे असल्यामुळे त्यांचेपासून पशुधन मालकांना सुध्दा अतिशय कमी प्रमाणात उत्पन्न मिळते.

*******

## ३.८ घरांची स्थिती

गोंदिया, गडचिरोली, नंदूरबार व ठाणे या ४ जिल्हयातील खावटी कर्ज वाटप केलेल्यापैकी १० तालुक्यातील २९ गावांतील २६७ आदिवासी जमातीच्या लाभधारकाकडून माहिती घेऊन पाहणीचे सर्वेक्षण पूर्ण करण्यात आले आहे. या आदिवासी जमातीच्या लाभधारकांच्या घरांची स्थिती खालीलप्रमाणे आहे.

अ) गोंदिया जिल्हयातील ३ तालुक्यातील ७ गावांची निवड खावटी कर्ज वाटप सर्वेक्षणासाठी करण्यात आली होती. या ७ गावांमधून खावटी कर्ज वाटप केलेल्यांपैकी ९२ लाभधारकांची पत्रके भरण्यात आली असून त्यांच्या घरांची स्थिती खालीलप्रमाणे आहे.

४५ लाभधारकांची घरे पूर्ण कच्च्या स्वरुपात आहेत. ४१ लाभधारकांची घरे अर्धे कच्चे या प्रकारात मोडतात. २ लाभधारकांची घरे पक्या स्वरुपाची आहेत तर इंदिरा आवास योजनेखाली २ लाभधारकांची घरे बांधण्यात आली आहेत व घरकुल योजनेतून १ लाभधारकास घर मिळाले आहे व १ लाभधारक बेघर आहे.

### तक्ता क्र. ३.८(अ)

**खावटी कर्ज वाटप सर्वेक्षण केलेल्या आदिवासी लाभधारक कुटूंबांची घरांच्या प्रकारानुसार माहिती**

| अ. क्रं. | जिल्हा | तालुका | गांव संख्या | एकूण लाभार्थी | घरांच्या प्रकारानुसार वर्गीकरण | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | पूर्ण कच्चे | अर्धे कच्चे | पक्के | इं.आ. घरकुल | ग्रा.वि.यंत्रणा घरकुल | बेघर |
| १. | गोंदिया | गोंदिया | ३ | ४७ | १० | ३५ | १ | १ | - | - |
| | | सालेकसा | २ | २० | १४ | ५ | - | - | १ | - |
| | | आमगांव | २ | २५ | २१ | १ | १ | १ | - | १ |
| | **एकूण** | | **७** | **९२** | **४५** | **४१** | **२** | **२** | **१** | **१** |
| २. | गडचिरोली | कुरखेडा | ५ | ३२ | - | २२ | ८ | २ | - | - |
| | | आरमोरी | २ | ३४ | १ | १३ | ७ | - | १३ | - |
| | **एकूण** | | **७** | **६६** | **१** | **३५** | **१५** | **२** | **१३** | **-** |
| ३. | नंदूरबार | तळोदा | ४ | ३१ | १९ | ८ | ४ | - | - | - |
| | | अक्कलकुवा | ४ | १७ | १२ | २ | ३ | - | - | - |
| | | अक्राणी | २ | ९ | ६ | २ | १ | - | - | - |
| | **एकूण** | | **१०** | **५७** | **३७** | **१२** | **८** | **-** | **-** | **-** |
| ४. | ठाणे | वाडा | ३ | १८ | २ | ९ | २ | २ | ३ | - |
| | | तलासरी | २ | ३४ | २ | २१ | ४ | ४ | ३ | - |
| | **एकूण** | | **५** | **५२** | **४** | **३०** | **६** | **६** | **६** | **-** |

## तक्ता क्र.३.८(ब)

**खावटी कर्ज वाटप सर्वेक्षण केलेल्या आदिवासी लाभधारक कुटूंबांची घरांच्या प्रकारानुसार जिल्हानिहाय माहिती**

| अ. क्रं. | जिल्हा | तालुका | गांव संख्या | एकूण लाभार्थी | घरांच्या प्रकारानुसार वर्गीकरण | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | पूर्ण कच्चे | अर्धे कच्चे | पक्के | इं.आ. घरकुल | ग्रा.वि.यंत्रणा घरकुल | बेघर |
| १. | गोंदिया | ३ | ७ | ९२ | ४५ | ४१ | २ | २ | १ | १ |
| २. | गडचिरोली | २ | ७ | ६६ | १ | ३५ | १५ | २ | १३ | - |
| ३. | नंदूरबार | ३ | १० | ५७ | ३७ | १२ | ८ | - | - | - |
| ४. | ठाणे | २ | ५ | ५२ | ४ | ३० | ६ | ६ | ६ | - |
| | **एकूण** | **१०** | **२९** | **२६७** | **६७** | **१३८** | **३१** | **१०** | **२०** | **१** |

यावरुन असे दिसून येते की एकूण लाभार्थीपैकी ९३%(८६) लाभार्थीची घरे पूर्ण अर्धे कच्चे अशा स्वरुपाची आहेत तर २% (२) लाभधारकांची घरे पक्या स्वरुपाची आहेत तर इंदिरा आवास व ग्रामीण विकास यंत्रणा घरकुल योजनेतून पूर्ण झालेली घरे ३% (३) लाभधारकांची आहेत. तर १% (१) लाभधारक बेघर आहे.

ब) गडचिरोली जिल्हयातील २ तालुक्यातील ७ गावांची निवड खावटी कर्ज वाटप सर्वेक्षणासाठी करण्यात आली होती. या ७ गावांमधून खावटी कर्ज वाटप केलेल्या लाभार्थीपैकी ६६ लाभार्थीची निवड पाहणीसाठी करण्यात आलेली होती. या लाभधारकांची पत्रके समक्ष माहिती घेवून भरण्यात आलेली आहेत. त्यांच्या घरांची स्थिती खालीलप्रमाणे आहे. पूर्ण कच्चे/अर्धे कच्चे घरे ३६% लाभधारकांची आहेत. १५ लाभधारक घरे पक्की असणारे आहेत. इंदिरा आवास योजने अंतर्गत २ लाभधारकांची घरे पूर्ण करण्यात आलेली आहेत. तर ग्रामीण विकास यंत्रणा घरकुल योजने अंतर्गत १३ लाभधारकांची घरे पूर्ण झालेली आहेत.

यावरुन असे दिसून येते की एकूण लाभार्थीपैकी ५५% (३६) लाभार्थीची घरे पूर्ण कच्चे/अर्धे कच्चे या स्वरुपाची आहेत. तर २३% (१५) लाभधारकांची घरे पक्की आहेत व २२% इंदिरा आवास व ग्रामीण विकास यंत्रणा घरकुल योजनेतून २२% (१५) लाभधारकांची घरे पूर्ण झालेली आहेत.

क) नंदूरबार जिल्हयातील ३ तालुक्यातील १० गावांची निवड खावटी कर्ज वाटप सर्वेक्षणासाठी करण्यात आली होती. या १० गावांमधून खावटी कर्ज वाटप झालेल्यापैकी ५७ लाभधारकांची पत्रके भरुन घेतली. या लाभधारकांच्या राहात्या घराची स्थिती याप्रमाणे आहे.

एकूण ५७ लाभार्थ्यांपैकी ४९ लाभधारक पूर्ण कच्चे/अर्धे कच्चे घरे असणारे आहेत व ८ लाभधारकांची घरे पक्या स्वरुपाची आहेत.

यावरुन असे दिसून येते की एकूण ५७ लाभधारकांपैकी ८६% (४९) लाभधारकांची घरे अर्धे कच्चे/पूर्ण कच्चे असणारे आहेत तर १४% (८) लाभधारकांची घरे पक्की आहेत.

ड) ठाणे जिल्हयातील २ तालुक्यातील ५ गावांची निवड खावटी कर्ज वाटप सर्वेक्षणासाठी करण्यात आली होती. या ५ गावांमधून खावटी कर्ज वाटप केलेल्यापैकी ५२ लाभधारकांचे प्रत्यक्ष सर्वेक्षण करण्यात आले आहे या लाभधारकांच्या घरांची स्थिती याप्रमाणे आहे.

एकूण ५२ लाभधारकांपैकी ३४ लाभधारकांची घरे पूर्ण कच्चे/अर्धे कच्चे या प्रकारची आहेत, ६ लाभधारकांची घरे पक्की आहेत तर १२ लाभधारकांना इंदिरा आवास व ग्रामीण विकास यंत्रणा घरकुल योजनेतून घरे बांधून देण्यात आलेली आहेत.

यावरुन असे दिसून येते की एकूण ५२ लाभधारकांपैकी ६५% (३४) लाभधारकांची घरे पूर्ण कच्चे/अर्धे कच्चे प्रकारची आहेत. १२% (६) लाभधारकांची घरे पक्की आहेत. तर २३% (१२) लाभधारक आदिवासींना इंदिरा आवास व ग्रामीण विकास यंत्रणा घरकुल योजनेतून घरे बांधून मिळालेली आहेत.

एकंदरीत या ४ ही जिल्हयातील सर्वेक्षणातील आदिवासींच्या राहात्या घराचा विचार करता ७७% (२०५) लाभधारकांची घरे पूर्ण कच्चे/अर्धे कच्चे अशा प्रकारची आहेत. व १२% (३१) लाभधारकांची घरे पक्की आहेत. ११% (३०) लाभधारकांची घरे इंदिरा आवास व ग्रामीण विकास यंत्रणा घरकुल योजनेतून लाभधारकांना बांधून देण्यात आलेली आहेत. तर एक लाभधारक बेघर असल्याचे आढळून आले आहे.

*******

## ३.९ व्यवसायानुसार वर्गीकरण

खावटी कर्ज वाटप सर्वेक्षण गोंदिया, गडचिरोली, नंदूरबार व ठाणे या ४ जिल्हयातील १० तालुक्यातील २९ गावांमध्ये समक्ष भेटी देऊन पूर्ण करण्यात आले. खावटी कर्ज वाटप केलेल्या एकूण लाभधारकापैकी २६७ लाभधारकांची प्रपत्रे पाहणीचे क्षेत्रीय भेटीच्या वेळी भरुन घेण्यात आली आहेत. या लाभधारक कुटूंबांचे व्यवसायानुसार वर्गीकरण पुढीलप्रमाणे आहे.

### तक्ता क्र. ३.९(अ)

**खावटी कर्ज वाटप सर्वेक्षण केलेल्या आदिवासी लाभधारक कुटूंबांचे प्रमुख व्यवसायानुसार वर्गीकरण**

| अ. क्र. | जिल्हा | तालुका | एकूण गांवे | लाभधारक कुटूंबांचे प्रमुख व्यवसायानुसार वर्गीकरण | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | शेती | शेतमजूरी | मजूरी | नोकरी | इतर | एकूण लाभधारक |
| १. | गोंदिया | १) गोंदिया | ३ | २६ | २१ | - | - | - | ४७ |
| | | २) सालेकसा | २ | १५ | २ | १ | १ | १ | २० |
| | | ३) आमगांव | २ | २१ | ४ | - | - | - | २५ |
| | **एकूण** | | **७** | **६२** | **२७** | **१** | **१** | **१** | **९२** |
| २. | गडचिरोली | १) कुरखेडा | ५ | २० | ११ | - | - | १ | ३२ |
| | | २) आरमोरी | २ | १५ | १९ | - | - | - | ३४ |
| | **एकूण** | | **७** | **३५** | **३०** | **-** | **-** | **-** | **६६** |
| ३. | नंदूरबार | १) तळोदा | ४ | १४ | ५ | ९ | १ | २ | ३१ |
| | | २) अक्कलकुवा | ४ | १० | १ | ४ | १ | १ | १७ |
| | | ३) अक्राणी | २ | ६ | २ | १ | - | - | ९ |
| | **एकूण** | | **१०** | **३०** | **८** | **१४** | **२** | **३** | **५७** |
| ४) | ठाणे | १) वाडा | ३ | १ | १५ | १ | १ | - | १८ |
| | | २) तलासरी | २ | ११ | १७ | ४ | १ | १ | ३४ |
| | **एकूण** | | **५** | **१२** | **३२** | **५** | **२** | **१** | **५२** |

अ) गोंदिया जिल्हयातील ३ तालुक्यातील ७ गावांचे खावटी कर्ज वाटप पाहणीसाठी सर्वेक्षण करण्यात आले. या ७ गावांमध्ये खावटी कर्ज वाटप केलेल्यांपैकी ९२ लाभधारकांची माहिती प्रपत्रात भरण्यात झाली असून या लाभधारक कुटूंबांच्या प्रमुख व्यवसायाची माहिती घेतली असता ६२ लाभधारक कुटूंबे शेती व्यवसाय करणारी, २७ कुटूंबे शेतमजूरी, १ कुटूंब फक्त मजूरीवरच उदरनिर्वाह करणारे आहे. तर एक कुटूंबांचा नोकरी हा प्रमुख व्यवसाय आहे.

एकूण ९२ लाभधारक कुटूंबांपैकी ६७% (६२) लाभधारक कुटूंबांचा शेती हा प्रमुख व्यवसाय आहे. तर २९% (२७) कुटूंबे शेतमजूरी करणारी आहेत. एका कुटूंबांचा १% (१) मजूरी हा प्रमुख व्यवसाय आहे. एक लाभधारक कुटूंब नोकरी करतात. व १% (१) लाभधारक कुटूंबांचा इतर व्यवसाय हा प्रमुख व्यवसाय आहे.

ब) गडचिरोली जिल्हयातील २ तालुक्यातील ७ गावांचे सर्वेक्षण खावटी कर्ज वाटप पाहणीसाठी

करण्यात आले. यावेळी भरण्यात आलेल्या प्रपत्रातील एकूण ६६ लाभधारक कुटूंबांचा प्रमुख व्यवसाय खालीलप्रमाणे आहे. ३५ लाभधारक कुटूंबांचा शेती हा प्रमुख व्यवसाय आहे ३० लाभधारक कुटूंबांचा प्रमुख व्यवसाय मंजूरीचे तर उर्वरीत १ लाभधारक कुटूंबांचा इतर व्यवसाय (किराणा दुकान) प्रमुख व्यवसाय आहे.

एकूण ६६ लाभधारक कुटूंबांपैकी ५३%(३५) लाभधारक कुटूंबांचा शेती हा प्रमुख व्यवसाय आहे व ४५% लाभधारक कुटूंबांचा मजूरी प्रमुख व्यवसाय आहे. तर २%(१) लाभधारक कुटूंबांचा इतर व्यवसाय (किराणा दुकान) प्रमुख व्यवसाय आहे.

क) नंदूरबार जिल्हयातील ३ तालुक्यातील १० गावांमधून खावटी कर्ज वाटप केलेल्यापैंकी ५७ लाभधारक कुटूंबांची पत्रके पाहणी दरम्यान भरण्यात आली. या लाभधारक कुटूंबांची प्रमुख व्यवसायानुसार वर्गीकरण केले असता ३० लाभधारक कुटूंबांचा शेती हा प्रमुख व्यवसाय असून ८ कुटूंबांचा शेतमजूरी प्रमुख व्यवसाय आहे. १४ लाभधारक कुटूंबांचा मजूरी हा प्रमुख व्यवसाय आहे. तर ३ कुटूंबांचा इतर व्यवसाय (टेलरकाम) प्रमुख व्यवसाय आहे.

एकुण ५७ लाभधारक कुटूंबांपैकी ५३%(३०) कुटूंबांचा शेती प्रमुख व्यवसाय आहे. १४% (८) लाभधारक कुटूंबांचा शेतमजूरी प्रमुख व्यवसाय आहे. २५%(१४) लाभधारक कुटूंबांचा मजूरी हा प्रमुख व्यवसाय आहे व ३%(२) लाभधारक कुटूंबांचा नोकरी हा प्रमुख व्यवसाय आहे तर ५%(३) कुटूंबांचा इतर व्यवसाय (टेलरकाम) प्रमुख व्यवसाय आहे.

ड) ठाणे जिल्हयातील २ तालुक्यातील ५ गावांचे खावटी कर्ज वाटप योजनेचे सर्वेक्षण करण्यात आले. त्यावेळी प्रपत्रात माहिती घेण्यात आलेल्या ५२ लाभधारक कुटूंबांचा प्रमुख व्यवसाय पुढीलप्रमाणे

१२ कुटूंबे शेती, ३२ कुटूंबे शेतमजूरी, ५ कुटूंबे मजूरी, २ कुटूंबे नोकरी, इतर व्यवसाय १ कुटूंब याप्रमाणे आहे.

एकुण ५२ लाभधारक कुटूंबांपैकी २३%(१२) लाभधारक कुटूंबांचा प्रमख व्यवसाय शेती आहे. ६२%(३२) लाभधारकांचा शेतमजूरी प्रमुख व्यवसाय आहे. ९%(५) कुटूंबांचा मजूरी हा प्रमुख व्यवसाय आहे. व २%(१) लाभधारक कुटूंबांचा इतर व्यवसाय हा प्रमुख व्यवसाय आहे.

सर्वेक्षण केलेल्या या ४ ही जिल्हयातील १० तालुक्यातील २९ गावांमधील कुटूंबांचा प्रमुख व्यवसायाचे वर्गीकरण पाहिले असता ५२%(१३९) कुटूंबांचा शेती हा प्रमुख व्यवसाय आहे. तर ३६%(९७) कुटूंबांचा शेतमजूरी प्रमुख व्यवसाय आहे.

८%(२०) लाभधारक कुटूंबांचा मजूरी हा प्रमुख व्यवसाय आहे.

२%(५) लाभधारक कुटूंबांचा नोकरी हा प्रमुख व्यवसाय आहे.

२%(६) लाभधारक कुटूंबांचा इतर व्यवसाय हा प्रमुख व्यवसाय आहे. हे खालील आलेखावरुन दिसून येईल.

## तक्ता. ३.९(ब)

### खावटी कर्ज वाटप सर्वेक्षण केलेल्या आदिवासी लाभधारक, कुटूंबांचे प्रमुख व्यवसायानुसार जिल्हानिहाय वर्गीकरण

| अ. क्र. | जिल्हा | तालुका | एकूण गांवे | लाभधारक कुटूंबांचे प्रमुख व्यवसायानुसार वर्गीकरण | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | शेती | शेतमजूरी | मजूरी | नोकरी | इतर | एकूण लाभधारक |
| १. | गोंदिया | ३ | ७ | ६२ | २७ | १ | १ | १ | ९२ |
| २. | गडचिरोली | २ | ७ | ३५ | ३० | - | - | १ | ६६ |
| ३. | नंदूरबार | ३ | १० | ३० | ८ | १४ | २ | ३ | ५७ |
| ४. | ठाणे | २ | ५ | १२ | ३२ | ५ | २ | १ | ५२ |
| | **एकूण** | **१०** | **२९** | **१३९** | **९७** | **२०** | **५** | **६** | **२६७** |

थोडक्यात आदिवासी जमातींमधील कुटूंबांकडे (लाभधारकांकडे) असलेली जमीन धारणा ही अत्यल्प असल्याने त्यांना शेतमजूरी व मजूरीशिवाय पर्याय नाही. त्यामुळे जवळपास ४३% (११७) लाभधारक कुटूंबे मजूरी करीत आहेत, तसेच त्यांचे शिक्षण सुध्दा जास्त झालेले नसल्यामुळे नोकरी व इतर व्यवसायामध्ये त्यांचे प्रमाण अल्प ४% (११) असल्याचे दिसून येते

*******

## ३.१० वार्षिक उत्पन्नानुसार वर्गीकरण

खावटी कर्ज वाटप करताना दारिद्र्य रेषेखालील आदिवासी जमातींच्या कुटूंबांना प्राधान्य देण्यात यावे असे शासनाचे आदेश आहेत.

गोंदिया, गडचिरोली, नंदूरबार व ठाणे या ४ जिल्हयातील खावटी कर्ज वाटप करण्यात आलेल्यापैकी १० तालुक्यातील २६७ लाभधारकांचे सर्वेक्षण करण्यात आले. या सर्व (२६७) लाभधारक कुटूंबांची नांवे दारिद्र्य रेषेखालील यादीत असल्याचे दिसून आले. तथापि या २६७ लाभधारकांपैकी ८% (१८१) लाभधारक भूधारक होते तर उर्वरीत ३२% (८६) लाभधारक भूमिहीन आहेत. या सर्व (२६७) लाभधारकांच्या वार्षिक उत्पन्नाची माहिती खालीलप्रमाणे आहे.

### तक्ता क्र. ३.१०(अ)

### खावटी कर्ज वाटप सर्वेक्षण केलेल्या आदिवासी लाभधारक कुटूंबांचे वार्षिक उत्पन्नाचे वर्गीकरण

| अ. क्र. | जिल्हा | तालुका | गावांची संख्या | भूधारक लाभधारक वार्षिक उत्पन्न | | | | | | भूमिहीन लाभधारक वार्षिक उत्पन्न | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | रु.० ते ५००० | रु.५००१ ते १०,००० | रु. १०,००१ ते १५,००० | रु.१५,००१ ते २०,००० | रु.२०,००१ पेक्षा जास्त | एकूण | रु.० ते ५००० | रु.५००१ ते १०,००० | रु. १०,००१ ते १५,००० | रु.१५,००१ ते २०,००० | रु.२०,००१ पेक्षा जास्त | एकूण |
| १. | गोंदिया | गोंदिया | ३ | - | ९ | १९ | ८ | - | ३६ | - | ६ | १ | ४ | - | ११ |
| | | सालेकसा | २ | - | ५ | ६ | ५ | | १६ | - | १ | १ | २ | - | ४ |
| | | आमगांव | २ | - | १० | ८ | ४ | - | २२ | - | २ | १ | - | - | ३ |
| | **एकूण** | | **७** | **-** | **२४** | **३३** | **१७** | **-** | **७४** | **-** | **९** | **३** | **६** | **-** | **१८** |
| २. | गडचिरोली | कुरखेडा | ५ | १ | १६ | ४ | २ | १ | २४ | - | ६ | २ | - | - | ८ |
| | | आरमोरी | २ | २ | ४ | ५ | ४ | - | १५ | २ | ९ | ७ | १ | - | १९ |
| | **एकूण** | | **७** | **३** | **२०** | **९** | **६** | **१** | **३९** | **२** | **१५** | **९** | **१** | **-** | **२७** |
| ३. | नंदूरबार | तळोदा | ४ | - | १५ | २ | - | - | १७ | २ | ६ | ३ | २ | १ | १४ |
| | | अक्कलकुवा | ४ | - | ८ | २ | १ | - | ११ | - | ४ | १ | - | १ | ६ |
| | | अक्राणी | २ | १ | २ | ३ | - | - | ६ | - | २ | १ | - | - | ३ |
| | **एकूण** | | **१०** | **१** | **२५** | **७** | **१** | **-** | **३४** | **२** | **१२** | **५** | **२** | **२** | **२३** |
| ४. | ठाणे | वाडा | ३ | - | - | १ | २ | १ | ४ | १ | १ | ५ | ७ | - | १४ |
| | | तलासरी | २ | - | २ | १६ | ६ | ६ | ३० | - | - | २ | २ | - | ४ |
| | **एकूण** | | **५** | **-** | **२** | **१७** | **८** | **७** | **३४** | **१** | **१** | **७** | **९** | **-** | **१८** |

## तक्ता क्र. ३.१०(ब)
## खावटी कर्ज वाटप सर्वेक्षण केलेल्याआदिवासी लाभधारक कुटूंबांचे जिल्हानिहाय वार्षिक उत्पन्नाचे वर्गीकरण

| अ. क्र. | जिल्हा | तालुका संख्या | गावांची संख्या | भूधारक लाभधारक वार्षिक उत्पन्न | | | | | | भूमिहीन लाभधारक वार्षिक उत्पन्न | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | रु.० ते ५००० | रु.५००१ ते १०,००० | रु. १०,००१ ते १५,००० | रु.१५,००१ ते २०,००० | रु.२०,००१ पेक्षा जास्त | एकूण लाभधारक | रु.० ते ५००० | रु.५००१ ते १०,००० | रु. १०,००१ ते १५,००० | रु.१५,००१ ते २०,००० | रु.२०,००१ पेक्षा जास्त | एकूण लाभधारक |
| १. | गोंदिया | ३ | ७ | - | २४ | ३३ | १७ | - | ७४ | - | ९ | ३ | ६ | - | १८ |
| २. | गडचिरोली | २ | ७ | ३ | २० | ९ | ६ | १ | ३९ | २ | १५ | ९ | १ | - | २७ |
| ३. | नंदूरबार | ३ | १० | १ | २५ | ७ | १ | - | ३४ | २ | १२ | ५ | २ | २ | २३ |
| ४. | ठाणे | २ | ५ | - | २ | १७ | ८ | ७ | ३४ | १ | १ | ७ | ९ | - | १८ |
| | **एकूण** | | **२९** | **४** | **७१** | **६६** | **३२** | **८** | **१८१** | **५** | **३७** | **२४** | **१८** | **२** | **८६** |

अ) गोंदिया जिल्हयातील एकूण ३ तालुक्यातील ७ गावांमधील ९२ लाभधारकांचे खावटी कर्ज वाटपाचे सर्वेक्षण करण्यात आले. त्यापैकी ८०%(७४) लाभधारक कुटूंबे भूधारक आहेत तर उर्वरित २०%(१८) लाभधारक कुटूंबे भूमिहीन आहेत.

भूधारक असणा-या ३२%(२४) लाभधारकांचे कुटूंबांचे वार्षिक उत्पन्न रु.५०००/- ते रु.१०,०००/- पर्यंत आहे. ४५%(३३) लाभधारकांचे कुटूंबांचे वार्षिक उत्पन्न रु.१०,०००/- ते रु.१५,०००/- पर्यंत आहे तर उर्वरित २३%(१७) लाभधारक कुटूंबांचे वार्षिक उत्पन्न रु.१५,०००/- ते रु.२०,०००/- पर्यंत आहे.

भूमिहीन असणा-या (१८) लाभधारकांपैकी ५०%(९) कुटूंबांचे वार्षिक उत्पन्न रु.५०००/- ते रु.१०,०००/- आहे. १७%(३) भूमिहीन कुटूंबांचे वार्षिक उत्पन्न रु.१०,०००/- ते रु.१५,०००/- पर्यंत आहे. तर उर्वरित ३३%(६) भूमिहीन लाभधारक कुटूंबांचे वार्षिक उत्पन्न रु.१५,०००/- ते रु.२००००/- पर्यंत आहे.

ब) गडचिरोली जिल्हयातील एकूण २ तालुक्यातील ७ गावांमधील ६६ लाभधारकांचे सर्वेक्षण करण्यात आले. त्यापैकी ५९%(३९) लाभधारक कुटूंबे भूधारक आहेत तर ४१%(२७) लाभधारक कुटूंबे भूमिहीन आहेत.

भूधारक असणा-या ३९ लाभधारक कुटूंबांतील उत्पन्नाची वर्गवारी खालीलप्रमाणे आहे. ८%(३) लाभधारक कुटूंबांचे वार्षिक उत्पन्न रु.५०००/- पर्यंत आहे. ५१%(२०) लाभधारक कुटूंबांचे वार्षिक उत्पन्न रु.५००१ ते रु.१०,०००/- पर्यंत आहे. २३%(९) लाभधारक कुटूंबांचे वार्षिक उत्पन्न रु.१,००१/- ते रु.१५,०००/- ते पर्यंत आहे. १५%(६) लाभधारक कुटूंबांचे वार्षिक उत्पन्न रु.१५००१ ते रु.२०,०००/- पर्यंत आहे. तर ३%(१) कुटूंबांचे वार्षिक उत्पन्न रु.२०,००१/- च्या वर आहे.

गडचिरोली जिल्हयातील सर्वेक्षण पूर्ण केलेल्या भूमिहीन असणा-या २ तालुक्यातील ७ गावांतील एकूण २७ लाभार्थी कुटूंबांपैकी ७%(२) लाभधारकांचे कुटूंबांचे वार्षिक उत्पन्न रु.५०००/- पर्यंत आहे. ५६%(१५) लाभधारकांचे वार्षिक उत्पन्न रु.५००१/- ते रु.१०,०००/- पर्यंत आहे. तर ३३%(९) लाभधारक कुटूंबांचे वार्षिक उत्पन्न रु.१०,००१/- ते रु.१५,०००/- पर्यंत आहे तर ४%(१) लाभधारकांचे वार्षिक उत्पन्न रु.१५,००१/- ते रु.२०,०००/- पर्यंत आहे.

क) नंदूरबार जिल्हयातील ३ तालुक्यातील १० गावांमधील ५७ लाभधारकांचे खावटी कर्ज वाटप पाहणीसाठी सर्वेक्षण करण्यात आले. त्यापैकी ६०%(३४) लाभधारक भूधारक आहेत तर उर्वरीत ४०%(२३) लाभधारक भूमीहीन आहेत.

भूधारक असणा-या ३४ लाभधारक कुटूंबांचे वार्षिक उत्पन्नानूसार वर्गीकरण पुढीलप्रमाणे आहे.

३% (१) लाभधारकांचे वार्षिक उत्पन्न रु.५,०००/- पर्यंत आहे. ७४%(२५) लाभधारकांचे वार्षिक उत्पन्न रु.५,००१/- ते रु.१०,०००/- पर्यंत आहे.२०%(७) लाभधारकांचे वार्षिक उत्पन्न रु.१०,००१/- ते रु.१५,०००/- पर्यंत आहे. २०%(७) लाभधारकांचे वार्षिक उत्पन्न रु.१०,००१/- ते १५,०००/- पर्यंत आहे. तर ३%(१) लाभधारकांचे वार्षिक उत्पन्न रु.१५,००१/- ते रु.२०,०००/- पर्यंत आहे.

नंदूरबार जिल्हयातील सर्वेक्षण पूर्ण केलेल्या व भूमीहीन असणा-या २३ लाभधारकांचे वार्षिक उत्पन्न पुढीलप्रमाणे आहे.

९% (२) लाभधारकांचे वार्षिक उत्पन्न रु.५,०००/- पर्यंत आहे. ५२%(१२) लाभधारकांचे कुटूंबांचे वार्षिक उत्पन्न रु.५,००१/- ते रु. १०,०००/- पर्यंत आहे. २१%(५) लाभधारकांचे कुटूंबांचे वार्षिक उत्पन्न रु.१०,००१/- ते रु.१५,०००/- पर्यंत आहे. रु.१५,००१/- ते २०,०००/- पर्यंत वार्षिक उत्पन्न असणारे ९%(२) लाभधारक आहेत तर ९%(२) लाभधारकांचे वार्षिक उत्पन्न रु.२०,०००/- पेक्षा जास्त आहे.

ड) ठाणे जिल्हयातील २ तालुक्यातील ५ गावांमधील ५२ लाभधारकांचे खावटी कर्ज वाटप पाहणीसाठी सर्वेक्षण करण्यात आले. त्यापैकी ६५%(३४) लाभधारक भूधारक आहेत तर उर्वरीत ३५%(१८) लाभधारक भूमीहीन आहेत.

भूधारक असणा-या ३४ लाभधारकांचे कुटूंबांचे वार्षिक उत्पन्न पुढीलप्रमाणे आहे. ६% (२) लाभधारक वार्षिक उत्पन्न रु.५००१/- ते रु.१०,०००/- पर्यंत आहे. ५०%(१७) लाभधारक कुटूंबांचे वार्षिक उत्पन्न रु.१०,००१/- ते रु.१५,०००/- पर्यंत आहे. २३%(८) लाभधारक कुटूंबांचे वार्षिक उत्पन्न रु.१५,००१/- ते रु.२०,०००/- पर्यंत आहे. तर २१%(७) लाभधारक कुटूंबांचे वार्षिक उत्पन्न रु.२०,००१/- पेक्षा जास्त आहे.

भूमीहीन असणा-या कुटूंबांचे १८ लाभधारक कुटूंबांचे वार्षिक उत्पन्न पुढीलप्रमाणे आहे.
६% (१) लाभधारक कुटूंबांचे वार्षिक उत्पन्न रु.५,०००/- पर्यंत आहे. व ६%(१) लाभधारक कुटूंबांचे वार्षिक उत्पन्न रु.५,००१/- ते रु.१०,०००/- पर्यंत आहे. ३८%(७) लाभधारक कुटूंबांचे वार्षिक उत्पन्न रु.१०,००१/- ते रु.१५,०००/- पर्यंत आहे. तर ५०%(९) लाभधारक कुटूंबांचे वार्षिक उत्पन्न रु.१५,००१/- ते रु.२०,०००/- पर्यंत आहे.

थोडक्यात सर्वेक्षण केलेल्या ४ ही जिल्हयातील भूधारक कुटूंबांचे वार्षिक उत्पन्न खालीलप्रमाणे आहे.

२%(४) लाभधारक कुटूंबांचे वार्षिक उत्पन्न रु.५,०००/- पर्यंत आहे. ३९%(७१) लाभधारक कुटूंबांचे वार्षिक उत्पन्न रु.५,००१/- ते रु.१०,०००/- पर्यंत आहे. ३७%(६६) कुटूंबांचे वार्षिक उत्पन्न रु.५,००१/- ते रु.१०,०००/- पर्यंत आहे. ३७%(६६) लाभधारक कुटूंबांचे वार्षिक उत्पन्न रु.१०,००१/- ते रु.१५,०००/- पर्यंत आहे. १८%(३२) लाभधारक कुटूंबांचे वार्षिक उत्पन्न रु.१५,००१/- ते रु.२०,०००/- पर्यंत आहे. तर ४%(८) लाभधारक कुटूंबांचे वार्षिक उत्पन्न रु.२०,००१/- पेक्षा जास्त आहे.

भूमीहीन लाभधारकांचे वार्षिक उत्पन्न :-

सर्वेक्षण करण्यांत आलेल्या ४ ही जिल्हयातील ८६ भूमिहीन लाभधारक कुटूंबांचे वार्षिक उत्पन्न खालीलप्रमाणे आहे.


६% (५) लाभधारक भूमीहीन कुटूंबांचे वार्षिक उत्पन्न रु.५,०००/- पर्यंत आहे.

४३% (३७) लाभधारक भूमीहीन कुटूंबांचे वार्षिक उत्पन्न रु.१०,००१/- ते रु.१५,०००/- पर्यंत आहे.

२८% (२४) लाभधारक भूमीहीन कुटूंबांचे वार्षिक उत्पन्न रु.५,०००/- पर्यंत आहे.


२१% (१८) लाभधारक कुटूंबांचे वार्षिक उत्पन्न रु.१५,००१/- ते रु.२०,०००/-पर्यंत आहे. तर २% (२) लाभधारक कुटूंबांचे वार्षिक उत्पन्न रु.२०,०००/-पेक्षा जास्त आहे.

**खावटी कर्ज वाटप सर्वेक्षण केलेल्या आदिवासी भूमिहीन लाभधारकांचे वार्षिक उत्पन्न**



खावटी कर्ज वाटप करण्यांत आलेल्या ४ जिल्हयातील २६७ लाभधारक कुटूंबांचे वार्षिक उत्पन्न पाहता ३% (९) लाभधारक कुटूंबांचे वार्षिक उत्पन्न रु.५,०००/- पर्यंत आहे. ४०% (१०८) लाभधारक कुटूंबांचे वार्षिक उत्पन्न रु.५,००१/- ते रु.१०,०००/- पर्यंत आहे. ३४% (९०) लाभधारक कुटूंबांचे वार्षिक उत्पन्न रु.१०,००१/- ते रु.१५,०००/- पर्यंत आहे. १९% (५०) लाभधारक कुटूंबांचे वार्षिक उत्पन्न रु.१५,००१/- ते रु.२०,०००/- पर्यंत आहे. तर ४% (१०) लाभधारक कुटूंबांचे वार्षिक उत्पन्न रु.२०,०००/-पेक्षा जास्त असल्याचे दिसून आले.

**खावटी कर्ज वाटप सर्वेक्षण केलेल्या आदिवासी लाभधारकांचे वार्षिक उत्पन्न**




*******

## ३.११ खावटी कर्ज वाटप योजना
## (माहितीचा स्त्रोत)

आदिवासी जमातीचे आर्थिक उन्नतीसाठी शासनाने विविध योजना राबविल्या आहेत. त्यापैकीच खावटी कर्ज वाटप योजना आहे. ऐन पावसाळयात आदिवासींची उपासमार होऊ नये म्हणून त्यांना अन्नधान्य, मसाल्याचे पदार्थ व काही रोख रक्कम या योजनेव्दारे उपलब्ध करुन देण्यात आली आहे. त्यांना या योजनेची माहिती कोणाकडून प्राप्त झाली ? याबाबतची माहिती सर्वेक्षणात घेण्यात आली आहे.

गोंदिया, गडचिरोली, नंदूरबार व ठाणे या ४ जिल्हयामध्ये ज्या आदिवासी जमातींना खावटी कर्जाचे वाटप करण्यात आले त्यापैकी एकूण (या ४ जिल्हयात) २६७ लाभधारकांची माहिती प्रपत्रामध्ये समक्ष घेण्यात आली असता जिल्हावार स्थिती खालीलप्रमाणे दिसून आली.

### तक्ता क्र. ३.११(अ)
### खावटी कर्ज वाटप सर्वेक्षण केलेल्या आदिवासी लाभधारकांना कर्जाच्या माहिती स्त्रोत

| अ. क्र. | जिल्हा | तालुका | गांव संख्या | लाभार्थी | लाभार्थ्यास माहिती कोणाकडून मिळाली | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | आदिवासी विकास महामंडळ | विविध कार्यकारी संस्था | ग्रामसेवक | तलाठी | सरपंच | कार्यकर्ता | प्रकल्प कार्यालय |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| १. | गोंदिया | गोंदिया | ३ | ४७ | ४७ | - | - | - | - | - | - |
| | | सालेकसा | २ | २० | २० | - | - | - | - | - | - |
| | | आमगांव | २ | २५ | २५ | - | - | - | - | - | - |
| | एकूण | | | | | | | | | | |
| २. | गडचिरोली | कुरखेडा | ५ | ३२ | - | ३२ | - | - | - | - | - |
| | | आरमोरी | २ | ३४ | - | ३४ | - | - | - | - | - |
| | एकूण | | ७ | ६६ | - | ६६ | - | - | - | - | - |

खावटी कर्ज वाटप सर्वेक्षण केलेल्या आदिवासी लाभधारकांना कर्जाच्या माहिती स्त्रोत

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३. | नंदूरबार | तळोदा | ४ | ३१ | २५ | - | - | - | ४ | २ | - |
| | | अक्कलकुवा | ४ | १७ | १६ | - | - | - | १ | - | - |
| | | अक्राणी | २ | ९ | ९ | - | - | - | - | - | - |
| | एकूण | | १० | ५७ | ५० | - | - | - | ५ | २ | - |
| ४. | ठाणे | वाडा | ३ | १८ | ६ | १२ | - | - | - | - | - |
| | | तलासरी | २ | ३४ | - | ३४ | - | - | - | - | - |
| | **एकूण** | | **५** | **५२** | **६** | **४६** | - | - | - | - | - |

## तक्ता. ३.११(ब)
## खावटी कर्ज वाटप सर्वेक्षण केलेल्या आदिवासी लाभधारकांना कर्जाच्या माहितीचा स्त्रोत जिल्हानिहाय वर्गीकरण

| अ. क्र. | जिल्हा | तालुका | गांव संख्या | लाभार्थी | लाभार्थ्यास माहिती कोणाकडून मिळाली | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | आदिवासी विकास महामंडळ | विविध कार्यकारी संस्था | ग्रामसेवक | तलाठी | सरपंच | कार्यकर्ता | प्रकल्प कार्यालय |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| १. | गोंदिया | ३ | ७ | ९२ | ९२ | - | - | - | - | - | - |
| २. | गडचिरोली | २ | ७ | ६६ | - | ६६ | - | - | - | - | - |
| ३. | नंदूरबार | ३ | १० | ५७ | ५० | - | - | - | ५ | २ | - |
| ४. | ठाणे | २ | ५ | ५२ | ६ | ४६ | - | - | - | - | - |
| | **एकूण** | | **२७** | **२६७** | **१४८** | **११२** | - | - | **५** | **२** | - |


अ) गोंदिया जिल्हयातील ३ तालुक्यातील खावटी कर्ज वाटप केलेल्या ७ गावांमधील ९२ लाभधारकांची माहिती घेतली असता. या सर्व म्हणजेच (९२)१००% लाभधारकांना खावटी कर्ज वाटप योजनेची माहिती आदिवासी विकास महामंडळामार्फत झालेली असल्याचे दिसून आले.

ब) गडचिरोली जिल्हयातील २ तालुक्यातील ७ गावांचे खावटी कर्ज वाटप योजनेचे लाभधारकापैकी ६६ लाभधारकांचे सर्वेक्षण केले असता १००% म्हणजेच (६६) लाभधारकांना या योजनेची माहिती विविध कार्यकारी संस्थेमार्फत झाल्याचे दिसून आले.

क) नंदूरबार जिल्हयातील ३ तालुक्यातील १० गावांमधील खावटी कर्ज वाटप ५७ लाभधारकांकडून या योजनेच्या माहितीबाबत विचारणा केली असता ८८%(५०) लाभधारकांना ही योजना आदिवासी विकास महामंडळाकडून राबविण्यात येत असल्याचे दिसून येते तर ९%(५) लाभधारकांना खावटी कर्ज वाटप योजना त्यांचे गावचे सरपंचाकडून समजली तर उर्वरित ३% (२) लाभधारकांना ही योजना कार्यकत्यांकडून माहिती झाल्याचे दिसून येते.

ड) ठाणे जिल्हयातील २ तालुक्यातील ५ गावांमध्ये खावटी कर्ज वाटप केलेल्या लाभार्थ्यापैकी ५२ लाभार्थ्यांचे सर्वेक्षण केले असता सदरची योजना १२% लाभार्थ्यांना (६) आदिवासी विकास महामंडळामार्फत समजली तर उर्वरीत ८८%(४६) लाभधारकांना विविध कार्यकारी संस्थेमार्फत सदरची योजना कार्यान्वित असल्याचे समजले.

एकंदरीत गोंदिया, गडचिरोली, नंदूरबार, व ठाणे या ४ जिल्हयातील १० तालुक्यातील २९ गावांचे खावटी कर्ज वाटप सर्वेक्षण केले असता ५५%(१४८) लाभधारकांना ही योजना आदिवासी विकास महामंडळामार्फत राबविण्यात येत असल्याचे व ४२%(११२) लाभधारकांना योजना कार्यान्वित असल्याचे विविध कार्यकारी संस्थेमार्फत समजले तर उर्वरीत ३%(७) लाभधारकांना योजना कार्यान्वित असल्याचे सरपंच/कार्यकर्त्यांकडून समजले थोडक्यात शिक्षणामुळे आदिवासी जमातींमध्ये/समाजामध्ये दिवसेदिवस सजगता/सतर्कता वाढत असून, त्यांच्यातील साक्षरतेचे प्रमाण वाढल्यामुळे त्यांना शासकीय योजनांची माहिती होऊ लागली आहे. त्यामुळे त्यांच्यासाठी ज्या विविध योजना आहेत त्याचा लाभ ते घेत असून आदिवासी जमातीच्या उन्नतीच्या दृष्टीने हे एक चांगले द्योतक असल्याचे दिसून येते. याबाबत खालील आलेखावरुन दिसून येईल.




*******

## ३.१२ खावटी कर्ज वाटप योजना :- मिळालेली मदत

आदिवासींची आर्थिक स्थिती व कुपोषणाचे प्रमाण लक्षात घेऊन आदिवासींचे, जीवनमान उंचावण्यासाठी सन १९७८ पासून खावटी कर्ज वाटप योजना शासनाने सुरु केलेली आहे. सदर योजनेत वेळोवेळी कुटूंबांतील संख्येनुसार सुधारणा करण्यात आलेली आहे. महाराष्ट्र शासन आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक : खाकवा-२००४/प्र.क्र.९६/भाग-२/का.८ दिनांक २० जुलै,२००४ अन्वये खावटी कर्जाचे सुधारीत दर खालीलप्रमाणे दिलेले आहेत.

**तक्ता क्र. ३.१२(अ)**

| अ. क्र. | कुटूंबांतील युनिटची संख्या | सुधारीत कर्जाचा दर रुपये | धान्यवाटप |
|---|---|---|---|
| १. | १ ते ४ | २,०००/- | रु.६२० चे धान्य रु.२००/- ची कडधान्ये रु.१८०/- गोडेतेल रु.१,०००/- रोखीत |
| २. | ५ ते ८ | ३,०००/- | रु.९६०/- चे धान्ये रु.३००/- ची कडधान्ये रु.२४०/- गोडेतेल रु.१५००/- रोखीत |
| ३. | ८ पेक्षा जास्त | ४,०००/- | रु.१२४०/-चे धान्ये रु.४०० ची कडधान्ये रु.३६०/- गोडेतेल रु.२०००/- रोखीत |

सदरहू योजना महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ, नाशिक यांचेमार्फत राबविण्यात येते. पूर्वी ही योजना ५०% रोख रक्कम व ५०% वस्तुरुपाने राबविण्यात येत होती. तथापि दिनांक २४ जून,२००५ च्या शासन निर्णयानुसार सदरची योजना ७०% वस्तुरुपाने (कर्ज स्वरुपात) व ३०% रोख (अनुदान स्वरुपात) राबविण्यात येत आहे.

सदर योजनेखाली कर्जवाटप करताना १) दारिद्रय रेषेखालील कुटूंबे २) कोलाम, कातकरी व माडीया या आदिम जमाती ३) नंदूरबार, नाशिक, ठाणे, अमरावती व गडचिरोली या ५ संवेदनशिल जिल्हयातील आदिवासींना प्राधान्य देणेबाबत शासनाचे आदेश आहेत.

## कर्ज वाटप योजनेचा झालेला लाभ

खावटी कर्ज वाटप योजना पाहणीसाठी गोंदिया, गडचिरोली, नंदूरबार व ठाणे या ४ जिल्हयातील १० तालुक्यातील २९ गावामधून २६७ लाभार्थी कुटूंबांची पत्रके भरुन घेण्यात आली आहेत. या लाभार्थी कुटूंबांना सदर कर्ज वाटप योजनेचा झालेला लाभ याबाबतची माहिती सोबतच्या तक्त्यात दिलेली आहे.

### तक्ता क्र.३.१२(ब)
### खावटी कर्ज वाटप सर्वेक्षण केलेल्या आदिवासी लाभार्थींना मिळालेल्या कर्जाचे वर्षनिहाय वर्गीकरण
### (सन २००७-०८ व २००८-०९)

| अ. क्र. | जिल्हा | तालुका | एकूण गांवे | एकूण लाभार्थी | सन २००७-०८ रक्कमनिहाय लाभार्थी संख्या | | | एकूण | सन २००८-०९ रक्कमनिहाय लाभार्थी संख्या | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | रु.२००० | रु.३००० | रु.४००० | | रु.२००० | रु.३००० | रु.४००० | |
| १) | गोंदिया | १) गोंदिया | ३ | ४७ | - | २ | ७ | ९ | - | १४ | २४ | ३८ |
| | | २) सालेकसा | २ | २० | - | ४ | ८ | १२ | - | - | ८ | ८ |
| | | ३) आमगांव | २ | २५ | - | २ | ११ | १३ | - | २ | १० | १२ |
| | **एकूण** | | **७** | **९२** | - | **८** | **२६** | **३४** | - | **१६** | **४२** | **५८** |
| २) | गडचिरोली | १) कुरखेडा | ५ | ३२ | ३ | ६ | १२ | २१ | - | ६ | ५ | ११ |
| | | २) आरमोरी | २ | ३४ | ४ | ७ | ८ | १९ | ४ | ६ | ५ | १५ |
| | **एकूण** | | **७** | **६६** | **७** | **१३** | **२०** | **४०** | **४** | **१२** | **१०** | **२६** |
| ३) | नंदूरबार | १) तळोदा | ४ | ३१ | - | २ | २ | ४ | २ | १८ | ७ | २७ |
| | | २) अक्कलकुवा | ४ | १७ | - | १२ | १ | ३ | - | ४ | - | ४ |
| | | ३) अक्राणी | २ | ९ | - | ८ | - | ८ | - | १ | - | १ |
| | **एकूण** | | **१०** | **५७** | - | **२२** | **३** | **२५** | **२** | **२३** | **७** | **३२** |
| ४) | ठाणे | १) वाडा | ३ | १८ | - | १० | - | १० | - | ८ | - | ८ |
| | | २) तलासरी | २ | ३४ | - | ४ | - | ४ | - | ३० | - | ३० |
| | **एकूण** | | **५** | **५२** | - | **१४** | - | **१४** | - | **३८** | - | **३८** |

## तक्ता क्र. ३.१२(क)

## खावटी कर्ज वाटप सर्वेक्षण केलेल्या आदिवासी लाभार्थींची कर्जाची रक्कमनिहाय माहिती

## (वर्ष २००७-०८ व २००८-०९)

| अ. क्र. | जिल्हा | तालुका | एकूण गांवे | एकूण लाभार्थी | कर्ज रक्कमनिहाय लाभार्थी संख्या रु.२००० | रु.३००० | रु.४००० | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | गोंदिया | १) गोंदिया | ३ | ४७ | - | १६ | ३१ | ४७ |
| | | २) सालेकसा | २ | २० | - | ४ | १६ | २० |
| | | ३) आमगांव | २ | २५ | - | ४ | २१ | २५ |
| | **एकूण** | | **७** | **९२** | - | **२४** | **६८** | **९२** |
| २) | गडचिरोली | १) कुरखेडा | ५ | ३२ | ३ | १२ | १७ | ३२ |
| | | २) आरमोरी | २ | ३४ | ८ | १३ | १३ | ३४ |
| | **एकूण** | | **७** | **६६** | **११** | **२५** | **३०** | **६६** |
| ३) | नंदुरबार | १) तळोदा | ४ | ३१ | २ | २० | ९ | ३१ |
| | | २) अक्कलकुवा | ४ | १७ | - | १६ | १ | १७ |
| | | ३) अक्राणी | २ | ९ | - | ९ | - | ९ |
| | **एकूण** | | **१०** | **५७** | **२** | **४५** | **१०** | **५७** |
| ४) | ठाणे | १) वाडा | ३ | १८ | - | १८ | - | १८ |
| | | २) तलासरी | २ | ३४ | - | ३४ | - | ३४ |
| | **एकूण** | | **५** | **५२** | - | **५२** | - | **५२** |
| **एकूण (४ जिल्हे)** | | **१०** | **२९** | **२६७** | **१३** | **१४६** | **१०८** | **२६७** |

अ) गोंदिया जिल्हयातील ३ तालुक्यातील ७ गावांतील खावटी कर्ज वाटप करण्यात आलेल्या लाभधारक कुटूंबांपैकी सन २००७-०८ व सन २००८-०९ या वर्षी खावटी कर्ज वाटप करण्यात आलेल्या ९२ लाभधारकांची माहिती घेतली असता. सन २००७-०८ या वर्षी एकूण ३४ कुटूंबांना या योजनेचा लाभ झालेला आहे त्यापैकी रु.३०००/- कर्ज वाटप करण्यात आलेली ७६% (२६) कुटूंबे आहेत. तर सन २००८-०९ या वर्षात एकूण ५८ कुटूंबांना या योजनेतील कर्ज प्राप्त झाले आहे. त्यातील २८% (१६) कुटूंबांना रु.३०००/- प्रति कुटूंबांप्रमाणे कर्ज अदा करण्यात आले आहे. व ७२% (४२) कुटूंबांना रु.४०००/- प्रति कुटूंबांप्रमाणे सदरचे कर्ज अदा करण्यात आले आहे. २४%(८) कुटूंबे आहेत व रु.४०००/- कर्ज वाटप करण्यात आलेली आहे.

दोन्ही वर्षात (सन २००७-०८ / सन २००८-०९) अदा करण्यात आलेल्या कर्जाबाबत २६% (२४) कुटूंबांना रुपये ३०००/- प्रति कुटूंब कर्ज प्राप्त झाले आहे व ७४%(६८) कुटूंबांना रु.४०००/- प्रति कुटूंब खावटी कर्ज मिळालेले आहे.

ब) गडचिरोली जिल्हयातील २ तालुक्यातील ७ गावांमधील खावटी कर्ज वाटप करण्यात आलेल्या लाभधारक कुटूंबांपैकी वर्ष २००७-०८ व २००८-०९ या वर्षी ज्यांना सदर कर्ज वाटप करण्यात आलेले आहे अशा ६६ लाभधारकांची माहिती प्रपत्रात भरुन घेतली असता सन २००७-०८ या वर्षी ४० कुटूंबांनी या योजनेमार्फत कर्ज घेतले आहे. तर सन २००८-०९ या वर्षी २६ कुटूंबांनी या योजनेमार्फत कर्ज घेतले असल्याचे दिसून येते.

सन २००७-०८ या वर्षी १८%(७) कुटूंबांनी रु.२०००/- खावटी कर्ज घेतले आहे. ३२%(१३) कुटूंबांनी रु.३०००/- कर्ज घेतले आहे. तर उर्वरीत ५०%(२०) कुटूंबांनी रु.४०००/- खावटी कर्ज घेतले आहे. सन २००८-०९ या वर्षी १५%(४) कुटूंबांनी रु.२०००/- खावटी कर्ज घेतले आहे. ४६%(१२) कुटूंबांनी रु.३०००/- कर्ज घेतले आहे. तर उर्वरीत ३९%(१०) कुटूंबांनी रु.४०००/- कर्ज घेतले आहे.

सन २००७-०८ व सन २००८-०९ या दोन्ही वर्षात मिळून खावटी कर्ज १७%(११) कुटूंबांनी रु.२०००/- प्रति कुटूंब घेतले आहे. ३८%(२५) कुटूंबांनी रु.३०००/- प्रति कुटूंब कर्ज घेतले आहे. उर्वरीत ४५%(३०) कुटूंबांनी प्रति कुटूंब रु.४०००/- खावटी कर्ज घेतलेले आहे.

क) नंदूरबार जिल्हयातील ३ तालुक्यातील १० गावांमधील खावटी कर्ज वाटप करण्यात आलेल्या वर्ष २००७-०८ व सन २००८-०९ यापैकी ५७ लाभधारक कुटूंबांची पाहणी या सर्वेक्षणाचे वेळी करण्यात आली आहे.

दोन्ही वर्षाचा एकत्रित विचार करता सन २००७-०८ मध्ये ४४% (२५) कुटूंबांना या योजनेचा लाभ झालेला आहे तर सन २००८-०९ मध्ये ५६% (३२) लाभधारकांनी या योजनेमार्फत कर्ज घेतले आहे.

सन २००७-०८ मध्ये खावटी कर्ज प्राप्त झालेल्या कुटूंबांपैकी ८८% (२२) लाभधारकांना प्रत्येकी रु.३०००/- कर्ज प्राप्त झाले आहे. व उर्वरित १२% (३) कुटूंबांना प्रत्येकी रु.४०००/- कर्ज या योजने अंतर्गत मिळाले आहे.

सन २००७-०८ व सन २००८-०९ या दोन्ही वर्षात मिळून खावटी कर्ज ४% (२) कुटूंबांनी रु.२०००/- प्रति कुटूंब घेतले आहे. ७९%(४५) कुटूंबांनी रु.३०००/- प्रति कुटूंब कर्ज घेतले आहे. व उर्वरीत १७% (१०) कुटूंबांनी रु.४०००/- कर्ज प्रति कुटूंब घेतले आहे.

## तक्ता क्र. ३.१२(ड)
## खावटी कर्ज वाटप सर्वेक्षण केलेल्या आदिवासी लाभार्थी कुटूंबांची जिल्हानिहाय कर्ज वाटप व रक्कमनिहाय माहिती

| अ. क्र. | जिल्हा | तालुका | एकूण गांवे | एकूण लाभार्थी | सन २००७-०८ मध्ये कर्जवाटप रक्कमनिहाय लाभार्थी कुटूंब संख्या | | | एकूण | सन २००८-०९ मध्ये कर्जवाटप रक्कमनिहाय लाभार्थी कुटूंब संख्या | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | रु.२०००/- | रु.३०००/- | रु.४०००/- | | रु.२०००/- | रु.३०००/- | रु.४०००/- | |
| १) | गोंदिया | ३ | ७ | ९२ | - | ८ | २६ | ३४ | - | १६ | ४२ | ५८ |
| २) | गडचिरोली | २ | ७ | ६६ | ७ | १३ | २० | ४० | ४ | १२ | १० | ११ |
| ३) | नंदूरबार | ३ | ४ | ३१ | - | २ | २ | ४ | २ | १८ | ७ | २७ |
| ४) | ठाणे | २ | ५ | ५२ | - | १४ | - | १४ | - | ३८ | - | ३८ |
| | एकूण | १० | २९ | २६७ | ७ | ५७ | ४९ | ११३ | ६ | ८९ | ५९ | १५४ |

ड) ठाणे जिल्हयातील २ तालुक्यातील ५ गावांमधील सन २००७-०८ व सन २००८-०९ या वर्षी खावटी कर्ज वाटप केलेल्या लाभधारक कुटूंबांपैकी ५२ लाभधारकांची पाहणी या सर्वेक्षणा अंतर्गत करण्यात आली. यापैकी १४ कुटूंबांनी खावटी कर्ज सन २००७-०८ मध्ये घेतले आहे. तर ३८ कुटूंबांनी खावटी कर्ज सन २००८-०९ मध्ये घेतले आहे. दोन्ही वर्षाचा एकत्रित विचार करता सन २००७-०८ मध्ये २७%(१४) कुटूंबांनी तर ७३%(३८) कुटूंबांनी या योजनेमार्फत कर्ज घेतले आहे.

२००७-०८ या वर्षी रु.३०००/- प्रति कुटूंब कर्ज घेतलेली १००%(१४) कुटूंबे आहेत तर सन २००८-०९ या वर्षी रु.३०००/- प्रति कुटूंब कर्ज घेतलेली १००%(३८) कुटूंबे आहेत.

खावटी कर्ज वाटप केलेल्या कुटूंबांची संख्या व त्यांना देण्यात आलेले खावटी कर्ज हे त्यांच्या कुटूंबांच्या संख्येच्या (Units) मर्यादेत देण्यात आलेले आहे.

या ४ जिल्हयातील एकूण २६७ लाभार्थ्यांची (सन २००७-०८ व २००८-०९ एकत्रित) माहिती घेतली असता ५%(१३) कुटूंबांनी रु.२०००/- खावटी कर्ज घेतले आहे. ५५%(१४६) कुटूंबांनी रु.३०००/- कर्ज घेतले आहे. तर ४०%(१०८) कुटूंबांना प्रत्येकी रु.४०००/- कर्ज प्राप्त झाले आहे.

*******

## तक्ता क्र. ३.१३
## (अ) खावटी कर्ज वाटप रोख रक्कमेचा विनियोग

गोंदिया, गडचिरोली, नंदूरबार व ठाणे या ४ जिल्हयातील १० तालुक्यांमधुन २६७ खावटी कर्ज वाटप लाभधारकांचे सर्वेक्षण केले असता लाभधारकांना ७०% धान्य स्वरुपात (कर्ज रुपाने) व ३०% रोख अशा स्वरुपात कर्ज दिलेले आहे. त्यापैकी रु.२०००/- कर्जधारकांना रु.६००/- रोख, रु.३०००/- कर्ज प्राप्त झालेल्या लाभधारकांना रु.१०००/- रोख तर रु.४०००/- कर्ज मिळालेल्या लाभधारकांना रु.१२००/- रोख व प्रत्येक कर्जदारास ७०% रक्कमेचे धान्य स्वरुपात, याप्रमाणे कर्ज वाटप करण्यात आलेले आहे.

खावटी कर्ज वाटप लाभधारकांकडे रोख रक्कमेच्या विनियोग बाबत चौकशी केली असता. बहुतांशी लाभधारकांनी घरगुती खर्च, किराणा, शेतीकामसाठी, आजारपणावरील खर्च, मुलांचे शिक्षणासाठी धान्य खरेदीसाठी इत्यादी कारणांवर रोख रक्कमेचा विनियोग केल्याचे सांगितले. फक्त एका लाभधारकाने या रोख रक्कमेतून शेळी विकत घेतल्याचे सांगितले.

## (ब) खावटी कर्जाची परतफेड

खावटी कर्जाची परत फेड ही ५ समान हप्त्यात लाभधारकांनी करावयाची आहे. सन २००७-०८ मध्ये खावटी कर्ज घेतलेल्या गोंदिया, गडचिरोली, नंदूरबार व ठाणे या ४ जिल्हयातील सर्वेक्षण केलेल्या एकुण ११३ लाभधारक कुटूंबांपैकी गडचिरोली जिल्हयातील ४० पैकी ४ कुटूंबांनी कर्ज परत फेडीचा पहिला हप्ता म्हणजेच १०% कुटूंबांनी कर्ज परत फेड केलेली आहे. तर ठाणे जिल्हयातील १४ लाभधारकापैकी ९ लाभधारकांनी कर्ज परत फेडीचा पहिला हप्ता म्हणजेच ६४% कुटूंबांनी कर्ज परत फेड केली आहे. सन २००७-०८ मध्ये सर्वेक्षण केलेल्या गोंदिया व नंदूरबार जिल्हयातील खावटी कर्ज धारकांनी काहीही कर्ज परत फेड केलेली नाही.

सन २००८-०९ मध्ये या चार जिल्हयामध्ये सर्वेक्षण केलेल्या एकूण खावटी कर्ज १५४ लाभधारक कुटूंबांनी कर्जाचा परत फेड केलेली नाही.

केंद्र शासनाने कर्जाची थकबाकी असलेल्या शेतक-यांना, केलेल्या कर्ज माफीचा परिणाम म्हणून, खावटी कर्ज माफ होईल या अपेक्षेने खावटी कर्ज घेतलेल्या, बहुतांशी आदिवासी जमातींच्या लाभार्थींनी कर्जाची परत फेड केलेली नाही. तसेच त्यांची कर्ज परत फेडीची आर्थिक क्षमता नसल्याने, व प्रापंचिक ओढाताणीमुळे सुध्दा ते कर्जाची परत फेड करु शकले नाहीत असे दिसून येते. खावटी कर्ज वाटप योजना सुरु झाल्यापासून आदिवासी जमातींना देण्यात आलेले कर्ज त्यांनी परतफेड न केल्यामुळे शासनाने वेळोवेळी माफ केलेले आहे. त्याचाही परिणाम म्हणून कर्ज परत फेड करण्याकडे त्यांचा कल दिसून येत नाही.

*******

## तक्ता क्र. ३.१४
## खावटी कर्ज वाटप योजना राबविण्यातील अडचणी व उपाय योजना

खावटी कर्ज वाटप योजना ही आदिवासी विकास महामंडळामार्फत राबविण्यात येते. खावटी कर्ज वाटप करताना दारिद्रय रेषेखालील आदिवासी कुटूंबांना प्राधान्य देण्यात यावे असे शासनाचे आदेश आहेत.

आदिवासी विकास विभाग, मुंबई-३२ यांचा शासन निर्णय क्रं.खाकषा-२००५/प्र.क्र.८०/का-८ दि. जून,२००५ नुसार लाभार्थ्यांना त्यांच्या कुटूंबांतील युनिटप्रमाण खावटी कर्ज वाटप करण्यात येते. उदा.:- १ ते ४ युनिट, ५ ते ८ युनिट, रु.३०००/- ८ युनिटपेक्षा जास्त रु.४०००/- याप्रमाणे खावटी कर्ज वाटप करण्यात येते. रु.२०००/- यातील ७०% कर्ज वस्तूरुपाने व ३०% कर्ज रोख स्वरुपात आदिवासी विविध कार्यकारी संस्थेमार्फत देण्यात येते. सदर कर्जदार जरी या संस्थेचा सदस्य नसेल तरी त्यांना कर्ज देण्यापूर्वी संबंधित संस्थेचे सभासदत्व देण्यात येते.

१) महाराष्ट्रातील पावसाळा हा मुख्यतः जून ते ऑगस्ट व सप्टेंबर असा असताना खावटी कर्ज वाटप हे मे पूर्वी पूर्ण करणे आवश्यक असून सुध्दा ते जून ते ऑगस्ट पर्यंत करण्यात येत आहे.

२) आदिवासी लाभार्थ्यांना खावटी कर्जातील रोख रक्कमेचे वाटप बँकेमार्फत केले जाते. सर्वसामान्य आदिवासी हे बँकेच्या व्यवहारापासून दूर असल्याने त्यांना बँकेपर्यंत पोहचण्यात अडचणी येतात.

३) आदिवासी लाभार्थ्यांना पावसाळयात त्यांच्या अडचणीच्या काळात दोन वेळच्या जेवणासाठी पुरविण्यात येत असलेल्या धान्य किंमती तुलनेने स्थानिक बाजार भावापेक्षा जास्त आहेत.

४) खावटी कर्जाची लाभधारकांकडे असलेली प्रचंड थकबाकी असल्यामुळे पुढील वर्षी गरजूंना कर्ज मिळण्यात अडचण निर्माण होते.

५) आदिवासी लोकांची खावटी कर्ज परतफेडीची क्षमता
आदिवासी लाभधारकांना खावटी कर्जाचे वाटप करतान ७०% कर्ज व ३०% अनुदान याप्रमाणे कर्ज देण्यात येते. तसेच कर्ज वाटप करताना ७०% कर्ज हे धान्य स्वरुपात व ३०% कर्ज हे रोख स्वरुपात देण्यात येते. पावसाळयात कर्ज वाटप झाल्यामुळे आदिवासींना या दिवसात मोलमजूरी मिळत नाही. मिळालेले धान्य आदिवासी स्वतःच्या कुटूंबांसाठी वापरतात. व रोख रक्कम जवळपास ९९% लाभार्थी कौटूंबिक अडचणी आजारपण इत्यादीसाठी वापरतात. तसेच पावसाळया व्यतिरिक्तच्या कालावधीमध्ये सुध्दा आदिवासींना स्थानिकरित्या विशेष रोजगार उपलब्ध नसल्याने त्यांची कर्ज परतफेड करण्याची क्षमताच कमी असल्याचे दिसून येते.

**उपाययोजना :-**

१) आदिवासी जमातींना खावटी कर्ज वाटप योजनेत ७०% कर्ज वस्तू रुपात मिळते त्याचे रुपातंर अनुदानात करण्यात यावे व रोख देण्यात येणारी ३०% रक्कम कर्ज म्हणून वसूल करण्यात यावी. म्हणजेच ७०% अनुदान व ३०% कर्जाच्या स्वरुपात वाटप व्हावे व असे बहुसंख्य लाभधारक आदिवासींचे मत आहे.

२) खावटी कर्ज वाटप योजने अंतर्गत देण्यात येणा-या धान्याचे मूल्य स्थानिक बाजारपेठातील बाजारभावाशी सममूल्य असावे.

३) खावटी कर्ज वाटप कार्यक्रम दि.३१ मे पूर्वी पूर्ण करण्यात यावा.

४) आदिवासी कुटूंबांतील एका सदस्याचे नांवे आधीच्या वर्षी खावटी कर्ज दिले असल्यास पुढील वर्षी त्याच कुटूंबांतील इतर सदस्याचे नांवे कर्ज वाटप करण्यात येते ही पध्दत बंद करावी त्यामुळे थकबाकीचे प्रमाण वाढत आहे ते कमी होईल.

५) खावटी कर्ज वाटपाचे प्रमाण शासनाने ठरविलेल्या निदेशाप्रमाणेच (७०% वस्तुरुपी व ३०% रोख स्वरुपात) करण्यात यावे.

६) खावटी कर्ज वाटप दारिद्रय रेषेच्या खाली असणा-या आदिवासींना प्राधान्याने देण्यात यावे.

७) आदिवासी भागामध्ये दरवर्षी पावसाळा संपताच रोजगार हमीची कामे सुरु करण्यात यावीत, त्यामुळे आदिवासींना स्थानिक रित्या रोजगार उपलब्ध होईल. व त्यांच्या उत्पन्नात वाढ होईल व त्यामुळे त्यांचे उत्पन्न वाढून त्यांचा चरितार्थ व्यवस्थित चालेले. व खावटी कर्ज परतफेड करण्याची क्षमता सुध्दा त्यांच्यात निर्माण होईल.

*******

# प्रकरण क्र. ४
# सारांश

आदिवासींचे आरोग्यात सुधारणा करणे, त्यांना आरोग्यविषयक सुविधा पुरविणे, त्यांना अन्नधान्य पुरवठा सुनिश्चित करुन पूरक आहार देणे आणि या सर्व उपाय योजनांव्दारे आदिवासींचे क्रियाशिल आयुष्य वाढविणे हा नवसंजीवन योजनेचा प्रमुख उद्देश आहे. त्या योजने अंतर्गत विविध घटक कार्यक्रमांचा समावेश करण्यात आलेला आहे. त्यामध्ये खावटी कर्ज योजनेचा समावेश करण्यात आलेला आहे.

अ) राज्यातील आदिवासी क्षेत्रातील गोंदिया, गडचिरोली, नंदूरबार व ठाणे या ४ जिल्हयातील १० तालुक्यातील २९ गावांचे सर्वेक्षण खावटी कर्जाचे संदर्भात करण्यात आले होते. त्यावेळी खावटी कर्ज २६७ लाभधारकांना समक्ष भेटून माहिती संकलित करण्यात आलेली आहे. थोडक्यात महाराष्ट्रात आदिवासींच्या ४५ जमाती आहेत. या सर्वेक्षणा अंतर्गत ८ जमातींचा समावेश झाल्याचे दिसून येते.
(उदा. :- गोंड, माना, हलबी, भिल्ल, पावरा, पाडवी, वारली व मल्हारकोळी)

ब) साक्षरतेबाबतची खावटी कर्ज लाभधारक कुटूंबांची माहिती घेतली असता या ४ जिल्हयातील सर्वेक्षण केलेल्या १३४२ लोकसंख्येपैकी ५७% लोकसंख्या साक्षर आहे व ४३% लोकसंख्या (लाभातील कुटूंबांतील) निरक्षर असल्याचे दिसून आले. यापैकी पुरुषांचे साक्षरतेचे प्रमाण ६६% आहे तर निरक्षरता ३४% आहे तर स्त्रियांचे साक्षरतेचे प्रमाण ४७% आहे व निरक्षरतेचे प्रमाण ५३% आहे. म्हणजेच स्त्रियांपेक्षा पुरुषांचे साक्षरतेचे प्रमाण १९% नी जास्त आहे.

क) सर्वेक्षण केलेल्या लाभार्थी कुटूंबातील शैक्षणिक स्थिती खालीलप्रमाणे दिसून येते. एकूण ७६७ शिक्षितापैकी १ ली ते ४ थी पर्यंत शिक्षण घेतलेले ३१%. ५ वी ते ७ वी शिक्षण घेतलेले २४%. ८ वी ते १० वी पर्यंत शिक्षण घेतलेले ३२%. ११ वी ते १२ वी शिक्षण पूर्ण केलेले ११%. डी.एड.पदवीका, बी.एड. व एस.वाय.बी.ए पर्यंत शिक्षण पूर्ण केलेले जवळपास २% सदस्य लाभार्थी कुटूंबातील आहेत.

ड) सर्वेक्षण केलेल्या लाभधारकांकडील जमीन धारणेचा विचार करता एकूण २६७ लाभधारकांपैकी ६७% लाभधारक भूधारक आहेत व ३३% लाभधारक भूमीहीन आहेत. भूधारक असणारे सर्वजन अल्पभूधारक आहेत. यापैकी ९३% भूधारकांची शेती जिरायत आहे तर ७% लाभधारकांची शेती बागायत आहे.

इ) खावटी कर्ज वाटप केलेल्या लाभधारकांकडील पशुधनाचा विचार करता ४९% लाभधारकांकडे पशुधन आहे व ५१% लाभधारकांकडे पशुधन नाही त्यामुळे त्यांना दुय्यम उत्पन्न नाही. तसेच असणारे पशुधन सुध्दा देशी जातीचे असल्यामुळे त्यांचेपासून लाभधारकांना विशेष उत्पन्न मिळत नाही.

फ) सर्वेक्षण केलेल्या २६७ लाभार्थीचे आदिवासी जमातनिहाय वर्गीकरण पाहिले असता हे लाभधारक ८ वेगवेगळया जमातीमधील असल्याचे व त्यातील गोंड३७%, हलबी १८%, माना ५%, भिल्ल १५%, पावरा ४%, पाडवी २%, वारली १७% व मल्हार कोळी १७% या प्रमाणात आहेत.

ग) सर्वेक्षण केलेल्या २६७ लाभार्थी कुटूंबांच्या घराची स्थिती पाहता ७७% लाभधारकांची घरे पक्या स्वरुपाची आहेत तर ११% लाभधारकांना इंदिरा आवास/घरकुल या योजनेतून घरे बांधून मिळालेली असल्याचे दिसून आले तर यातील १ लाभधारक हा बेघर असल्याचे निदर्शनास आले आहे.

ट) सर्वेक्षण केलेल्या २६७ लाभधारक कुटूंबांचा प्रमुख व्यवसाय पाहता ५२% कुटूंबे शेती, ३६% कुटूंबे शेतमजूरी, ८% मजूरी, २% नोकरी व २% कुटूंबे इतर व्यवसाय करणारी आहेत. एकूण ६८% लाभधारकांकडे कुटूंबांना शेती असून सुध्दा फक्त ५२% लाभधारक कुटूंबे शेती करतात. लाभधारकांकडे कुटूंबांला शेती असून सुध्दा फक्त ५२% लाभधारक कुटूंबे शेती करतात. उर्वरीत १६% भूक्षेत्र असणारे लाभधारक शेतमजूरी/किंवा मजूरी करीत असल्याचे दिसून येते. अल्प व जिरायती शेतीमुळे कुटूंबांचा खर्च शेती व्यवसायातून भागविणे अवघड असल्यामुळे अनेकांना चरीतार्थासाठी मजूरी करण्याशिवाय पर्याय नसल्याचे दिसून येते.

र) खावटी कर्ज वाटप सर्वेक्षणातील २६७ लाभार्थी कुटूंबांचे ढोबळ मानाने वार्षिक उत्पन्न पाहिले असता ४३% कुटूंबांचे वार्षिक उत्पन्न रु.१०,००१/- ते रु.२०,०००/- पर्यंत आहे. फक्त ४% कुटूंबांचे वार्षिक उत्पन्न रु.२०,०००/- पेक्षा जास्त आहे.

थोडक्यात आदिवासींच्या वार्षिक उत्पन्नावर सुध्दा मर्यादा आहेत. ~~शेती उत्पन्नामधून वर्षभराचे धान्य सुध्दा मर्यादा आहेत~~. शेती उत्पन्नामधून वर्षभराचे धान्य सुध्दा मिळत नाही. स्थानिकरित्या रोजगार उपलब्ध नाही, त्यामुळे खावटी कर्ज योजनेमुळे आदिवासींना अडचणीच्या वेळी अतिशय मोलाची मदत होते. परंतू हीच मदत कौटूंबिक खर्चात संपल्यामुळे परतफेडीची क्रय शक्ती नसल्याने थकबाकीचे प्रमाण वाढत आहे. केंद्र शासनाने थकीत शेतक-यांची शेती कर्ज माफ केल्यामुळे आदिवासी खावटी व इतर प्रकारचे कर्ज घेतलेल्या लाभधारकांमध्ये कर्ज माफीची अपेक्षा वाढल्यामुळे व परतफेड न झाल्यामुळे थकबकीदारांचे प्रमाण मोठया प्रमाणावर वाढले आहे.

खावटी कर्ज वाटपमध्ये ७०% रक्कम अन्नधान्य कर्ज रुपाने व ३०% रक्कम अनुदान हे रोख स्वरुपात देण्यात येते. परंतू हीच पध्दत ७०% रक्कम अन्नधान्य रुपाने अनुदानित देण्यात यावे व ३०% रोख रक्कम ही कर्ज रुपाने देण्यात यावी असे बहुतांशी आदिवासी लाभधारकांचे मत आहे. त्यामुळे कर्जाचा कमी प्रमाणावरील बोजा आदिवासी पेलू शकतील व कर्ज थकबाकी न वाढता परतफेडीस चालना मिळून ही योजना भविष्यात सुध्दा शासनास सुरु ठेवता येईल.

*******

# प्रकरण क्र. ५
## निष्कर्ष

खावटी कर्ज वाटप योजना ही आदिवासी जमातीच्या अत्यंत फायद्याची आहे. ऐन पावसाळयाच्या दिवसात उपासमारी होऊ नये म्हणून मिळालेली मदत/कर्ज आदिवासींना संजीवनीसारखे वाटते. त्या योजनेमुळे कुपोषण कमी होऊन आदिवासी जमातीचे क्रियाशील आयुष्य वाढण्यास मदत झाल्याचे दिसून येते.

तथापि खावटी कर्ज मिळालेली बहुतांशी आदिवासी कुटूंबे थकबाकीदार असल्यामुळे खावटी कर्ज घेण्यास पात्र ठरत नाहीत व त्यामुळे या योजनेचा उद्देश सफल होत नाही. खावटी कर्ज वाटप योजनेत ७०% कर्ज वस्तुरुपाने व ३०% अनुदान रोख स्वरुपात मिळते, आदिवासींना पावसाळयात रोजगार मिळणे जवळपास दुरापास्त आहे तसेच त्यानंतर ही स्थानिकदृष्टया मोठया प्रमाणात रोजगार नसल्यामुळे त्यांची कर्ज परतफेडीची क्षमता कमी झालेली आहे. उपलब्ध जमिन व इतर संसाधने साधन सामुग्रीवर आदिवासींना वर्षभराचा चरितार्थ चालविणे अवघड आहे. केंद्रशासनाने शेतक-यांना दिलेल्या कर्ज माफीचा परिणाम म्हणून आपले सुध्दा कर्ज माफ होईल या अपेक्षेने बहुतेक कर्जदारांनी कर्जाचे हप्ते भरलेले नाहीत असे दिसून आले. आदिवासी जमातीमध्ये शिक्षणाचा प्रसार पूर्वी झालेला नव्हता. आदिवासींमध्ये स्थलांतर प्रवृत्ती कमी आहे त्यामुळे त्यांचा इतर भागाशी संपर्क नाही. परिणामतः स्थानिकरित्या कायम रोजगार उपलब्ध होत नाही. निवासी आश्रमशाळांमुळे आदिवासींची तरुणपिढी शिक्षित होत आहे. जसजसा शिक्षणाचा प्रसार वाढेल तसे रोजगारासाठी ते बाहेर पडतील. शिक्षणामुळे स्थलांतरामुळे नोकरीच्या संधी त्यांना उपलब्ध होतील. व स्थानिक संसाधनांवरील भार कमी होईल. भविष्यात आदिवासी समाज सुध्दा इतर ग्रामीण/शहरी भांगाशी एकरुप होऊन राष्ट्रीय समाज जीवनाशी एकरुप होईल.

आदिवासी समाजाकडे मर्यादित साधने, अपुरी जिरायती शेती असल्यामुळे उत्पादन कमी, तसेच कुटूंबांतील सदस्यांची संख्यासुध्दा सरासरीपेक्षा जास्त आहे. त्यामुळे सरकारने दिलेले खावटी कर्ज व रोख रक्कम कुटूंबांवरच खर्च होते व कर्ज परतफेडीची इच्छा असूनही खावटी कर्जाची परतफेड करता येत नाही.

त्यामुळे शासनाने त्यांना खावटी कर्ज वेळोवेळी माफ केलेले आहे. खावटी कर्जाचे संदर्भात ७०% अन्नधान्य रुपाने अनुदान व ३०% रक्कम रोखीने कर्ज स्वरुपात द्यावी अशी आदिवासी समाजाची अपेक्षा आहे. तसे झाल्यास कर्जाचा जास्त बोजा त्यांचेवर पडणार नाही व कमी रक्कमेचा कर्जाचे हप्ते परतफेड करणे त्यांना शक्य होईल. व थकबाकीचे प्रमाण सुध्दा आटोक्यात येऊन ही एक चांगली योजना असल्याचे त्याचे भविष्यात दूरगामी परिणाम दिसून येतील.

*******




मा. ना. डॉ. श्री. विजयकुमार गावित साहेब